CMYK





# पार्श्वभूमि

बीड वर्ष ३६ वे अंक ९४ वा फोन २३०१०१ दिनांक ३ मार्च २०२६ मंगळवार

गंमत भंडारी

ई-पेपर : www.parshvbhumi.com

Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501

पाने ६ किंमत ४रु.




रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818


# १०० टक्के अनुदानित विभागातील शिक्षकांना जुनी पेन्शन मिळणार

## छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाचे महत्वपूर्ण आदेश

**बीड दि.२(प्रतिनिधी):– ऑक्टोबर २००५ पुर्वी अंशत: अनुदानित नियुक्त होवून नंतर १०० टक्के अनुदानित विभागात कार्यरत झालेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागु करावी असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे न्यायमुर्ती अरूण आर.पेडणेकर आणि न्या.वैशाली जाधव पाटील यांनी दिला आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील अशा पध्दतीने नियुक्त झालेल्या आणि १०० टक्के अनुदानित विभागात कार्यरत असलेल्या अनेक शिक्षकांना या निर्णयामुळे दिलासा मिळाला आहे.**




याप्रकरणी ३१ ऑक्टोंबर २००५ पुर्वी विनाअनुदानित तुकडीवर, टप्पा अनुदानित तुकडीवर कार्यरत असणाऱ्या १०० टक्के अनुदानित शाळावरील सहाय्यक शिक्षक, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक यांनी जुनी पेन्शन योजना लागु करण्याच्या मागणीसाठी याचिका दाखल करण्यात आली होती.

याचिकाकर्ते ३१ ऑक्टोबर २००५ पुर्वी अंशत: अनुदानित विभागात नियुक्त झालेले होते. पुढे संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान मिळाल्यानंतरही त्यांना जुनी पेन्शन योजना लागु करण्यात आली नाही. त्याऐवजी त्यांना डीसीपीएस/एनपीएस लागु करण्यात आली. पान २ वर

### काय आहे आदेश ?

**न्यायालयाने सुनावणीनंतर याचिकाकर्त्यांचा दावा ग्राह्य धरत राज्य शासन व संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना निर्देश दिले की, पात्र शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच १ नोव्हेंबर २००५ पुर्वी नियुक्त होवुन निवृत्त झालेल्या शिक्षकांना पेन्शन प्रस्तावाची प्रक्रिया निश्चित कालावधीत पूर्ण करावी, असे ही आदेशात म्हटले आहे.**

# पाण्याचे फुगे, जबरदस्तीचा रंग लावल्यास कारवाई करावी

बीड दि.२ (प्रतिनिधी):– होळी आणि धुलिवंदनाचा सण शांततेत व सुरक्षित वातावरणात साजरा होणे गरजेचे आहे, परंतु काही समाज कंटक यास कलंक लावतात. फुग्यात रंग भरुन तो फेकून मारला जातो, त्यामुळे डोळ्यासारख्या नाजूक अवयवाला इजा होऊन तो निकामीही होऊ शकतो. दुसरे म्हणजे रस्त्यावरुन येणाऱ्या जाणाऱ्यांना त्यांच्या इच्छे विरुद्ध रंग लावला जातो. विविध कारणांनी काहींना रंग जमत नाही, परंतु हा प्रकार बीड शहरात जास्त चालतो. त्यांच्यावरही प्रतिबंधात्मक कारवाईची गरज आहे, असे अनेक ज्येष्ठ नागरिकांनी बोलून दाखविले. या बरोबरच महिलांची छेडछाड, सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा आणणारे प्रकार आढळल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिल्या पर्यावरण स्नेही होळीच्या शुभेच्छा



मुंबईदि.२ (प्रतिनिधी):- होळी व धुलीवंदनानिमित्त सर्वांनी पर्यावरणपूरक होळी साजरी करावी या उपक्रमाच्या अनुषंगाने पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांना पर्यावरणपूरक पाच रंगाचा समावेश असलेला संच देऊन पर्यावरणस्नेही होळी शुभेच्छा दिल्या. होळी व धुलीवंदन तसेच रंगपंचमी हा सण राज्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. रंग खेळताना ते पर्यावरणपूरक व नैसर्गिक असावेत, यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने पर्यावरणपूरक होळी, धुलिवंदन व रंगपंचमी साजरी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. याच उपक्रमांतर्गत पान २ वर

## धुळवड साजरी करण्यासाठी जाणाऱ्या कार कोलांटउड्या घेत विहिरीच्या कठड्याला धडकली

# बीडमधील युवक ठार तिघे गंभीर जखमी





बीड दि.२ (प्रतिनिधी):- धुलिवंदन साजरा करण्यासाठी रिसॉर्टवर जाणाऱ्या तरूणांच्या कारला भिषण अपघात झाल्याची दुर्देवी घटना सोमवारी पहाटे बीड-शिरूर रोडवरील नागऱ्याचीवाडी येथे घडली. चालकाचे नियंत्रण सुटल्याने भरधाव कार तीन-चार पलट्या घेत एका विहिरीच्या कठड्याला जाऊन धडकली. या अपघातात बीड शहरातील युवक जागीच ठार झाला असुन त्याच्यासोबतचे अन्य तीन मित्र गंभीर जखमी झाले आहेत. त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यास छत्रपती संभाजीनगर येथील रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. कठड्याला धडकल्यामुळे कार जागीच थांबली अन्यथा विहीरीत कोसळून मोठा अनर्थ घडला असता.

बीड शहरातील रामतिर्थ परिसरातील कृष्णा जालिंदर मुळे (वय २२) हा आपल्या मित्रांसोबत धुलिवंदन साजरा करण्यासाठी परजिल्ह्यातील रिसॉर्टवर जात होते. व्हेरना आणि थार अशा दोन गाड्यांमधुन हा मित्र परिवार बीडहून शिरूरमार्गे जात असतांना नागऱ्याचीवाडी येथे व्हेरना कारमधील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार तीन-चार पलट्या घेत शेतातील विहीरीच्या कठड्याला जाऊन धडकली. या अपघातात कृष्णा जालिंदर मुळे (वय २२) याचा जागीच मृत्यू झाला तर प्रसाद खोले, यश पेंढारे व अन्य एक असे तिघेजण गंभीर पान २ वर

# अंजली दमानियांचे सर्वच आरोप लोकायुक्तांनी फेटाळले

## धनंजय मुंडेंवर लावलेले सर्व आरोप न्यायव्यस्थेपुढे ठरले खोटे



**मुंबई दि.२ (प्रतिनिधी) – राज्याचे माजी मंत्री तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते आ. धनंजय मुंडे यांचा आणखी एका न्यायालयीन लढाईत विजय झाला असून, कृषी साहित्य खरेदी, ऑफिस ऑफ प्रॉफिट यासह वेगवेगळ्या आरोप करणाऱ्या अंजली दमानिया यांचे सर्व आरोप राज्य लोक आयुक्तांनी फेटाळून लावले आहेत.**



धनंजय मुंडे हे राज्याचे कृषिमंत्री असताना एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी योजनेंतर्गत विशेष कृती कार्यक्रम राबवून त्याअंतर्गत नॅनो खते, कापूस बॅग, बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप आदी साहित्य खरेदी करण्यात आले, त्यामध्ये अनियमितता करून शेकडो कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला होता. या संदर्भात माननीय मुंबई उच्च न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्या बाजूने निकाल दिला व संबंधितांचे आरोप फेटाळून लावल्यानंतर अंजली दमानिया यांनी राज्य लोक आयुक्तांकडे याबाबत तक्रार केली होती.


लोकायुक्त यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे संपूर्णतः ऐकून घेऊन, सर्वोच्च न्यायालयाचे विविध निकाल तसेच संविधानिक तरतुदींचा अभ्यास करून माननीय मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल हा स्वयंस्पष्ट असून या प्रकरणातील आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसून सदर आरोप फेटाळून लावत असल्याचे आपल्या निकालामध्ये स्पष्ट केले आहे.

उच्च न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्या विरोधातील पडगिलवार यांच्यासह विविध पान २ वर

### माहिती चुकीची व अर्धवट

**यासंदर्भात धनंजय मुंडे यांचे वकील श्री शार्दुल सिंह यांनी धनंजय मुंडे यांची बाजू मांडताना खासदार जया बच्चन यांच्या संबंधातील सर्वोच्च न्यायालयाच्या एका खटल्याचा संदर्भ देत ऑफिसर प्रॉफिट बाबत लोकायुक्तांकडे देण्यात आलेली माहिती ही चुकीची व अर्धवट असल्याचे नमूद केले.**

# भारत शांती आणि स्थैर्याच्या बाजूने -नरेंद्र मोदी



नवी दिल्ली दि.२ (प्रतिनिधी):- अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर केलेल्या भीषण हल्ल्यानंतर मध्यपूर्वेत युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र चिंता व्यक्त करत शांतता आणि संवादाचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. सध्याची परिस्थिती अत्यंत गंभीर असून या संकटातून बाहेर पडण्यासाठी चर्चेशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही असे पंतप्रधानांनी स्पष्ट केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, जगभरात सध्या तणावाचे वातावरण आहे. भारत नेहमीच शांतता आणि स्थैर्याचा समर्थक राहिला असून भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध आहे. भारत सर्व देशांसोबत सहकार्य करत संवादाच्या माध्यमातून प्रश्न सोडवण्याच्या भूमिकेवर ठाम आहे. पान २ वर

## होळी सण उत्साहात

बीड दि.२ (प्रतिनिधी):- जिल्ह्यात होळी सण उत्साहात साजरा करण्यात आला. गल्लोगल्ली व घरागणीक होळी पेटवून सण आनंदोत्सवात व शांततेत पार पडला. वाईट जे काही असेल त्याचे दहन या सणानिमीत्त करण्यात येते.

# शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार शेतकरी विरोधी कायद्यांची होळी

## शेतकऱ्यांना गांजा, अफु, तंबाखू लागवडीस परवानगी द्या -डॉ.गणेश ढवळे




बीड दि.२ (प्रतिनिधी):- एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारत देशात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यात महाराष्ट्र राज्यात ३८.५ टक्के प्रमाण असुन महाराष्ट्र पहिल्या स्थानावर आहे. मराठवाड्यात गेल्या सन २०२५ वर्षात ११२९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यात २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नव वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी आत्महत्यांची नोंद आहे. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे आणि शेतकरी विरोधी कायद्यांमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. याच्या निषेधार्थ आणि शेतकऱ्यांचे आर्थिक जिवनमान उंचावत शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एनडीपीएस कायद्यात बदल करून शेतकऱ्यांना गांजा, अफु, तंबाखु लागवडीसाठी रीतसर परवानगी देण्यात यावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०२ होळी दिवशी सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ''शेतकरी विरोधी कायद्यांची होळी करत सरकार विरोधी धोरणांच्या निषेधार्थ बोंबा ठोकत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. निवेदन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड, शेख युनुस, सुदाम तांदळे, शेख मुबीन, बाळासाहेब मोरे पाटील पान २ वर

# गुटख्याच्या साठेबाजीवर पोलिसांचा छापा



बीड दि.२ (प्रतिनिधी):- अंबाजोगाई शहर पोलिसांनी शेपवाडी येथे धाड टाकून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व पानमसाला जप्त केला. या कारवाईत सुमारे ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेपवाडी येथील रहिवासी रविकिरण ज्योतिबा शेप (वय २८) यांच्या घरी प्रतिबंधित गुटखा व पानमसाला विक्रीसाठी साठवून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक, अंबाजोगाई यांच्या आदेशाने संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. छाप्यामध्ये ०१ विमल पानमसाला, डायरेक्टर पानमसाला तसेच तंबाखूचे पाउच असा एकूण अंदाजे ५५,००० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. पान २ वर






# विविधतेत एकता साधणारे रंगोत्सवाचा सांस्कृतिक आणि सामाजिक महोत्सव

फाल्गुन पौर्णिमेच्या तेजस्वी चंद्रप्रकाशात जेव्हा वसंत ऋतूची चाहूल लागते, तेव्हा भारतीय संस्कृतीत रंग, आनंद आणि नवचैतन्याची उधळण करणारा सण म्हणजे होळी. २ मार्च रोजी होळी दहनाचा पवित्र सोहळा साजरा होत आहे आणि ३ मार्च धुलिवंदन अर्थात रंगांचा मुक्त जल्लोष अनुभवायला मिळणार आहे. हा सण केवळ रंगांचा खेळ नाही, तर मनातील कटुता जाळून टाकण्याचा, नात्यांना नव्याने रंगवण्याचा आणि समाजात ऐक्य निर्माण करण्याचा उत्सव आहे. ''होली के दिन दिल खिल जाते हैं'' या गीतातील भावना असो किंवा ''अरे रंग दे, रंग दे रे'' सारख्या मराठी लोकधुनीतील उत्साह - होळी प्रत्येकाच्या आयुष्यात आनंदाचे इंद्रधनुष्य उभे करते.



होळीचा उगम प्रह्लाद आणि होलिका यांच्या पौराणिक कथेतून दिसतो. हिरण्यकश्यपूच्या अहंकाराचा अंत आणि भक्त प्रह्लादाच्या श्रद्धेचा विजय ही कथा सत्य, श्रद्धा आणि भक्ती यांचे सामर्थ्य अधोरेखित करते. होलिकेचे दहन म्हणजे दुष्ट प्रवृत्तींचा अंत; तर प्रह्लाद म्हणजे विश्वास आणि संयमाचे प्रतीक. ''जिथे भक्ती, तिथे शक्ती'' ही म्हण या कथेतून जिवंत होते. दक्षिण भारतात या दिवशी ''कामदहन'' परंपरेची कथा सांगितली जाते, ज्यात भगवान शिवांनी कामदेवाचा दहन केला असे मानले जाते. अशा विविध पान २ वर



**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार, बीड

### सुट्टीची सूचना

मंगळवार दि.३ मार्च २०२६ रोजी धुलिवंदनानिमीत्त पार्श्वभूमी कार्यालयास सुट्टी असल्याने बुधवार दि.४ मार्च २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, एजंट, जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.

–संपादक

CMYK

# कु.स्वप्नाली देशमुख यांचे एमपीएससी परीक्षेत यश

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता पदावर निवड

माजलगाव दि.२ (प्रतिनिधी :)- येथील कु.स्वप्नाली सुधीर देशमुख (मोगरेकर) यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) परीक्षेत यश संपादन करत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर निवड मिळवून उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून सर्व स्तरांतून कौतुक व्यक्त करण्यात येत आहे. कु.स्वप्नाली देशमुख यांनी आपले माध्यमिक शिक्षण श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय येथे पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, बीड येथून सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमा शिक्षण पूर्ण केले. डिप्लोमा शिक्षणादरम्यान त्यांनी ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची छाप पाडली.त्यांच्या उत्कृष्ट गुणवत्तेची दखल घेत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या हुशार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलत योजनेअंतर्गत अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांना शैक्षणिक शुल्कामध्ये १०० टक्के सवलत मिळाली. पुढे त्यांनी श्री तुळजाभवानी इंजिनिअरिंग कॉलेज, तुळजापूर येथून अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केले.सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे घेतलेल्या परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवत त्यांची कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर निवड झाली आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्या प्रेरणादायी ठरत आहेत.अत्यंत साध्या व गरीब परिस्थितीतून त्यांनी हे यश मिळवले आहे. त्यांचे वडील सुधीर देशमुख हे फ्रेम मेकर असून फोटो बनविण्याचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, तर आई सौ.शुभांगी देशमुख या कुमार ड्रेसेस या कापड दुकानात नोकरी करतात. कुटुंबाच्या मर्यादित आर्थिक परिस्थितीतही आई-वडिलांनी प्रामाणिकपणा, कष्ट आणि शिक्षणाची जिद्द



यांची दिलेली शिकवण स्वप्नाली यांच्या यशामागे महत्त्वाची ठरली. त्यांचा भाऊ देखील पुणे येथे अभियांत्रिकी शिक्षण घेत असून संपूर्ण कुटुंब शिक्षणाच्या बळावर प्रगतीचा मार्ग निवडत आहे.आई-वडिलांच्या अथक परिश्रमांचा, संघर्षाचा आणि प्रामाणिक जीवनमूल्यांचा सन्मान करत कु.स्वप्नाली देशमुख यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांना दिले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील उज्ज्वल कारकिर्दीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# खोटा व द्वेषपूर्वक दाखल केलेला गुन्हा रद्द करून चौकशी करा

## शेख इर्शाद यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

बीड दि.२६ (प्रतिनिधी):- बीड शहर पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.नं. ५७/२०२६ हा माझा भाऊ शेख बिलाल रज्जाक व इतर दोन निर्दोष व्यक्तींविरुद्ध खोटा व द्वेषपूर्वक दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करून सखोल व निष्पक्ष चौकशी करावी अशी मागणी शेख इर्शाद शेख रज्जाक यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

बीड येथील शेख इर्शाद अब्दुल रज्जाक यांनी पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की. दिनांक ०२/०८/२०२४ रोजी माझ्या ताब्यातील सर्व्हे नं. ४२, तरफ गिराम, सहन प्लॉट क्र. २ व ३ (एकत्रित साईज ६० फूट ु १०० फूट, एकूण ६००० चौ. फुट) बाबत इसार पावतीद्वारे शेख मुजीब शेख खाजा (संपादक) यांच्याशी व्यवहार करण्यात आला होता. त्यानंतर शेख मुजीब यांनी सदर इसार पावतीचा गैरवापर करून दिनांक १०/०१/२०२५ रोजी शेख मोहम्मद उर्फ सादिक मेंबर यांना इसार पावती करून रक्कम स्वीकारली. करारनामा (Bond No. CX 803767, रु. ५००/- मुद्रांक) मध्ये दिनांक १०/०३/२०२५ पर्यंत संपूर्ण रक्कम अदा करून खरेदीखत करून देण्याची अट नमूद आहे.

परंतु संबंधितांनी आजपर्यंत संपूर्ण रक्कम अदा केलेली नाही. उलट मला वारंवार टाळाटाळ व दबाव टाकण्यात येत होता. मी त्यांना स्पष्टपणे सांगितले होते की, पूर्ण रक्कम देऊन खरेदीखत करून घ्यावे, अन्यथा घेतलेली रक्कम परत घेऊन व्यवहार रद्द करावा. सदर आर्थिक व्यवहाराच्या पार्श्वभूमीवर शेख सादिक व अन्वर यांच्यात त्यांच्या कार्यालयासमोर वाद झाला. वाद मिटविण्यासाठी मला बोलावण्यात आले. शेख मुजीब यांनी स्वतः आम्हाला त्यांच्या सिटीझन पेपर कार्यालयात चर्चेसाठी बोलावले.

चर्चेदरम्यान काही बाहेरील व्यक्ती आवाज ऐकून आत आल्यामुळे गोंधळ निर्माण झाला व कार्यालयात किरकोळ नुकसान झाले. मात्र या प्रकाराशी माझा किंवा माझा भाऊ शेख बिलाल रज्जाक तसेच इतर दोन व्यक्तींचा कोणताही संबंध नसताना आम्हाला गुन्ह्यात गोवण्यात आले आहे. दि. २६ फेब्रुवारी २०२६ पासुन ते दि. २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंतचे सिसिटीव्ही फुटेज तपास करण्यात याव्यात. घटनेपूर्वी सुमारे तीन तासांपूर्वीचे संपूर्ण सीसीटीव्ही फुटेज तपासल्यास संबंधित कार्यालयात तलवार, दांडे इत्यादी वस्तू आधीच ठेवण्यात आलेल्या असल्याचे स्पष्ट दिसून येईल. मात्र संपूर्ण फुटेज न तपासता केवळ काही मिनिटांचा व्हिडिओ दाखवून आमच्यावर खोटे आरोप लावण्यात आले आहेत. सत्य परिस्थिती समोर येण्यासाठी ६.०० ते ९.०० वाजेपर्यंतचे संपूर्ण फुटेज जप्त करणे अत्यावश्यक आहे. सर्व प्रकरणाची चौकशी करून न्याय द्यावा अशी मागणी शेख इर्शाद यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# मेरा युवा भारत अंतर्गत विमला शाळेत निबंध स्पर्धा संपन्न



गेवराई दि.२ (प्रतिनिधी) :- मेरा युवा भारत योजने अंतर्गत रंगार चौक, गेवराई येथील विमला माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात निबंध स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे आयोजन सत्यजित संतोष (जिल्हा युवा अधिकारी, मेरा युवा भारत) यांनी केले होते. प्रमुख उपस्थितीत प्रकाश त्रिभुवन (जिल्हा समन्वयक, मेरा युवा भारत, छत्रपती संभाजीनगर), कडूदास कांबळे (प्रदेश समन्वयक, महाराष्ट्रसामाजिकसुरक्षासमिती), पांडूरंग खरात (गेवराई तालुका समन्वयक, मेरा युवा भारत) व निलेश त्रिभुवन (सामाजिक कार्यकर्ते, छत्रपती संभाजीनगर) यांचा समावेश होता. या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य मुख्याध्यापक जोगदंड के. जी.यांनी केले . या निबंध स्पर्धेचे विषय होते - १) सुभाषचंद्र बोस, २) विजयी दिवस, ३) माझ्या स्वप्नातील भारत. या स्पर्धेत इयत्ता ८ वी व ९ वी वर्गाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. कडूदास कांबळे (महाराष्ट्रसामाजिकसुरक्षासमितीचे प्रदेश समन्वयक) या कार्यक्रमात मार्गदर्शन करत असताना त्यांनी निबंध स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा विकास व्हावा यासाठी अशा स्पर्धा अत्यंत गरजेच्या आहेत असे ते म्हणाले. बक्षीस वितरणानंतर जिल्हा समन्वयक प्रकाश त्रिभुवन यांनी नेहरू युवा केंद्राचे 'मेरा युवा भारत' केंद्रात नामांतर झाल्याचे सांगितले. मेरा युवा भारत केंद्राच्या माध्यमातून होणाऱ्या विविध सामाजिक स्पर्धा व उपक्रमांबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. यापुढेही विमला विद्यालयातील विद्यार्थ्यांना कलागुण विकसित करण्यासाठी स्पर्धांच्या संधी उपलब्ध करून देऊ असे त्यांनी घोषित केले. या निबंध स्पर्धेत भाग घेतलेल्या विजेत्यांची नावे १) इयत्ता ८ वी वर्गातून प्रथम - कु. काव्या अमोल कानपूरे, २) द्वितीय कु. वेदिका सुदर्शन वाईकर, ३) तृतीय चि. वेदप्रमोद आमलेकर तर इयत्ता ९ वी वर्गातून १) प्रथम - कु. ऋतिका लहू म्हेत्रे, २) द्वितीय कु. गौरी दादासाहेब खडके व ३) तृतीय कु. ऋतिका सुदर्शन खुणे याप्रमाणे आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेंद्र कुलकर्णी सर यांनी केले. मुख्याध्यापक जोगदंड के.जी. यांनी समारोपात मेरा युवा भारत केंद्राचे आभार मानले. तसेच भविष्यातील संधींची अपेक्षा व्यक्त केली. परीक्षक म्हणून श्रीमती जवंजाळ के.एस., जिरेवाड सुनील मारूतीराव व सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती घुगे एस.एस. यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

# दुचाकी चोराची माहिती देणाऱ्यास पोलिसांकडून बक्षीस जाहीर

बीड दि.२(प्रतिनिधी):- जिल्ह्यात सध्या दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बीड जिल्ह्यातील गर्दीच्या ठिकाणी दुचाकीचोर हे चोरी करत असल्याचे दिसत आहे. विशेषतः बीड शहरातील शासकीय रुग्णालय परिसरातून अनेक दुचाकी चोरीस गेल्याच्या घटना समोर आल्या आहेत. पोलिसांनी काही चोरीच्या दुचाकींचा शोध लावण्यात यश मिळवले असले तरी अजूनही काही वाहनांचा तपास सुरू आहे. या प्रकरणातील संशयित चोराचा शोध घेण्यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष पथकाची नियुक्ती केली असून नागरिकांची मदत मागितली आहे. दुचाकी चोरा बाबत खात्रीशीर माहिती देणाऱ्या व्यक्तीस पोलिसांकडून रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. नागरिकांनी आपली वाहने सुरक्षित ठिकाणी पार्क करावीत, दुचाकींना मजबूत लॉक लावावे तसेच सीसीटीव्ही यंत्रणांचा वापर करावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. संपर्कासाठी क्रमांक- १. गहिनीनाथ बावनकर पोलीस जमादार.. ९६२३५१६६५२, २. महेश जाधव पोलीस उपनिरीक्षक बीड शहर ८८८८९९०३८६, ३. शितल कुमार बल्लाळ पोलिस निरीक्षक बीड शहर. ७५८८८०७७७४

बीड दि. २ (प्रतिनिधी):- शहरात वाढलेल्या डासांच्या संख्येमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. नगर पालिकेने डास प्रतिबंधक औषधांचा वापर करावा अशी मागणी शहरातील सर्वच भागातील नागरिकांनी केली आहे.

# खडकी येथील अतिक्रमण जागेची तक्रार दिल्यामुळे ग्रा.पं. सदस्य संतोष थोरात यांना जिवे मारण्याची धमकी

**गेवराई दि.२ (प्रतिनिधी) :- मौजे खडकी-टाकळगव्हाण येथील ग्रामपंचायत जागेवर काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. हे अतिक्रमण काढून टाकण्यात यावे व या जागेवर तलाठी कार्यालय, अंगणवाडी इमारत, ग्रामपंचायत भवन इमारत अशी शासकीय कार्यालय मंजूर आहेत. त्या इमारतीचे बांधकाम व्हावे अशी रास्त मागणी ग्रा.पं.सदस्य संतोष थोरात यांनी केली होती.परंतु शासकीय जागेवर अतिक्रमण केल्यामुळे ती कामे होऊ न शकल्याने निधी परत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे संतोष थोरात यांनी मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई, बीड जि.प.चे मुख्यकार्यकारी अधिकारी, मा.जिल्हाधिकारी बीड यांना लेखी तक्रार केली होती. मौजे खडकी-टाळलगव्हणचे**



**ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक हजारे साहेब यांनी संबंधित अतिक्रमण धारकांना नोटीस पाठवल्या आहेत. तरी ते अतिक्रमण काढायला तयार नाहीत, उलट ग्रामसेवक यांना उलट-सुलट भाषा वापरत आहेत. या तक्रारीचा राग मनात धरून अतिक्रमण धारकांनी ग्रा.पं.सदस्य संतोष थोरात यांना जिवे मारण्याची धमकी दिली आहे. त्यांनी मा.पोलीस अधीक्षक बीड यांना लेखी निवेदन देऊन मला व माझ्या कुटुंबाला जिवे मारण्याची धमकी दिल्याचे निवेदन दिले आहे. तसेच संबंधितावर तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी देखील ग्रा.पं.सदस्य संतोष थोरात यांनी केली आहे.**

# आठ वर्षीय अलीना शेख यांचा जीवनातील पहिला रोजा पूर्ण

परळी दि २ (प्रतिनिधी)- पवित्र रमजान महिन्यानिमित्त परळी येथील आठ वर्षीय अलीना शेख हिने आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण करून सर्वांसमोर प्रेरणादायी आदर्श ठेवला आहे. अलीना ही ॲड. शेख एजाज यांची कन्या आहे. सध्या वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवरही अलीनाने दिवसभर पाण्याचा थेंब न पिता सुमारे १४ तासांचा कडक रोजा पूर्ण केला. तिच्या या जिद्दीचे व चिकाटीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



परळी येथील मित्रपरिवार, नातेवाईक तसेच विविध स्तरांतील नागरिकांकडून अलीनावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. लहान वयातच धार्मिक संस्कार आणि आत्मसंयम जपल्याबद्दल तिचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. अलीनाच्या या प्रयत्नामुळे कुटुंबियांचा आनंद द्विगुणित झाला असून, तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्वांकडून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

पान १ वरून

## शिक्षकांना जुनी पेन्शन मिळणार

जी अन्यायकारक आहे, असे नमुद करत त्या विरोधात छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, जालना,बीड, धाराशिव परभणी, जळगांव येथील सहाय्यक शिक्षक, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी याचिका दाखल केल्या होत्या. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड.माजीत शेख, ॲड.महेश देशमुख यांनी ॲड.के.डी.पोते, ॲड.अरविंद अबेदकर आदींनी बाजु मांडली. राज्य शासनातर्फे सहाय्यक सरकारी वकील ॲड.ए.आर.काळे यांनी युक्तीवाद केला. तर अहिल्यानगर जिल्हा परीषदेसाठी ॲड.सुवर्णा एम.जवरे यांनी बाजु मांडली.

## अंजली दमानियांचे सर्वच आरोप फेटाळले

जनहित याचिका यांच्यावरती एकत्रित निकाल देताना हे आरोप केवळ व्यावसायिक दृष्टिकोनातून व खोट्या पुराव्यांच्या आधारे केलेले असून राज्य शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयावर व्यवसायिक दृष्टीने खोटी माहिती समोर आणून शंका उपस्थित करणे हे कायद्याला धरून नसल्याचे स्पष्ट करत, सर्व याचिका फेटाळून लावल्या होत्या. तसेच याचिकाकर्त्यांना एक लाख रुपयांचा दंड ठोठावला होता.

त्यानंतर संबंधित याचिकाकर्त्यांना जर निकाल मान्य नसता तर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात या विरोधात अपील करायला हवे होते मात्र त्यांनी अद्याप अपील न करता दंड भरला; याचाच अर्थ याचिका करते यांना सुद्धा उच्च न्यायालयाने दिलेला निकाल मान्य होता.

उच्च न्यायालयाने या निकालामध्ये नोंदविलेली निरीक्षणे ही स्वयंस्पष्ट, निर्णायक व शासनाच्या धोरणाला अनुसरून असल्याने तसेच याचिकाकर्त्या अंजली दमानिया यांच्याकडे संबंधित याचिकेमध्ये जोडलेल्या बाबींव्यतिरिक्त, बनावट पुरावे असून कुठलाही ठोस पुरावा किंवा दखल घेण्यायोग्य काहीही नसल्याने यामध्ये आणखी वेगळी सुनावणी घेण्याचा कोणताही मुद्दा शिल्लक राहत नाही, असेही लोकायुक्तांनी आपल्या निकालात स्पष्ट केले आहे.

कृषी साहित्य खरेदी सोबतच अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात ऑफिस प्रॉफिट सह विविध आरोप केले होते.

धनंजय मुंडे यांनी निवडणूक आयोगाला विधानसभा निवडणुकीत आपल्या शपथ पत्रात चुकीची माहिती दिल्याच्या आरोपातून क्लीन चीट, मुंडेंच्या बाजूने निकाल.

ऑफिस ऑफ प्रॉफिट संदर्भाने केलेले आरोप पूर्णपणे खोटे असल्याचे आजच्या निकालाने स्पष्ट झाले.

या प्रकरणात देखील संविधानातील ठराविक काही कलमे, लोकप्रतिनिधीत्व कायदा, लोकप्रतिनिधींच्या हक्कांचे संरक्षण यांसह सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास केला असून, लोक आयुक्तांच्या अखत्यारीतील कोणताही ऑफिस ऑफ प्रॉफिटचा मुद्दा किंवा त्या अनुषंगाने कुठलाही आरोप सिद्ध होत नाही; तसेच याचिकाकर्ते अंजली दमानिया यांनी याबाबत देखील कुठलाही महत्वाचा नवीन पुरावा त्यांच्या पुरवणी जबाबात देखील सादर केलेला नाही. त्यामुळे ऑफिस ऑफ प्रॉफिट चा मुद्दा हा देखील निकाली काढला असून, त्यातही धनंजय मुंडे यांना क्लीन चीट देण्यात आली आहे.

दरम्यान मागील एका वर्षापासून अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात जे काही आरोप केले ते उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतर आता लोकायुक्तांनी देखील सदर आरोप फेटाळून लावले असल्याने, अंजली दमानिया यांच्या केवळ तोंडाच्या वाफा व धनंजय मुंडे यांच्या बदनामीचा असफल प्रयत्न होता, हे सिद्ध झाले आहे, अंजली दमानिया यांना या निकालाने एकप्रकारे न्यायव्यवस्थेने एक प्रकारची चपराक लावली आहे, असे म्हणावे लागेल.

दरम्यान धनंजय मुंडे यांच्या वरती मागील काही महिन्यात वेगवेगळ्या प्रकारचे अनेक आरोप करण्यात आले, त्यावरून त्यांची बदनामी करण्याची एकही संधी विरोधकांनी सोडली नाही, मात्र मुंडे यांच्या विरोधातील एक एक आरोप खोटा सिद्ध होण्याची मालिका देखील सुरू असून आज त्यात या निकालाने महत्वाची भर पडली आहे.

महत्त्वाचे निकाल

कृषी मंत्री असताना कृषी साहित्य खरेदीबाबत करण्यात आलेल्या आरोपात उच्च न्यायालय त्यापाठोपाठ आता लोकायुक्त यांनी देखील मुंडेंच्या बाजूने निकाल दिला. पीकविमा संदर्भात कोणताही घोटाळा झाला नसून राज्यात मागील दहा वर्षातील सर्वाधिक पीकविमा धनंजय मुंडे यांच्या कृषिमंत्री कार्यकाळात महाराष्ट्राला मिळाला, असे स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ सभागृहात सांगितले.

## अपघातात बीडमधील युवक ठार

जखमी झाले. त्यांच्यासोबतची थार गाडी पाठीमागे असल्याने त्यांनी तात्काळ जखमींना बाहेर काढले. जखमींपैकी प्रसाद खाले याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यास उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील रूग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले. तर यश पेंढारे व अन्य एकावर बीडच्या खाजगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान सदरील अपघाताची माहिती बीडमध्ये कळताच कृष्णा मुळे याच्या कुटूंबियांसह मित्र परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला.

## गुटख्याच्या साठेबाजीवर छापा...

याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८४/२०२६ अन्वये भारतीय न्यायसंहिता २०२३ कलम १२३, २७४, २७५, २२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक बीड नवनीत कांवट, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक रक्षीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोनि शरद जोगदंड, पोउनि शिंदे तसेच पोलिस कर्मचारी तेजेश वाहुळे, अमोल गायकवाड, सुषांत गायकवाड, भागवत नागरगोजे, युवराज राठोड यांनी कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.

## शेतकरी विरोधी कायद्याची होळी...

(प्रांताध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच) माजी सैनिक अशोक येडे ( बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी) ,रामधन जमाले ( बीड जिल्हाध्यक्ष इंटक), कुलदीप करपे(बीड जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना), सुहास जायभाये ( बीड जिल्हा कोषाध्यक्ष डीवायएफआय), डॉ.संजय तांदळे ( अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ता संघटना बीड), प्राचार्य डी .जी.तांदळे(बीड अध्यक्ष किसान सभा महाराष्ट्र राज्य) ,प्रा.कॉ. विठ्ठलराव सवासे (किसान सभा म.रा.बीड ), प्रभाकर धुमाळ, राजेंद्र धुमाळ,माऊली शिंदे जिल्हा सदस्य आम आदमी पार्टी बीड आदी सहभागी होते.

## पंकजा मुंडे यांनी दिल्या होळीच्या शुभेच्छा...

मंत्री पंकजा मुंडे यांनी पर्यावरणपूरक होळी, रंगपंचमी व धुलिवंदन साजरी करण्याचे आवाहन केले आहे. याचाच एक भाग म्हणून त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांना भेटून पर्यावरणपूरक रंगाचे संच देऊन शुभेच्छा दिल्या.

## भारत शांती आणि स्थैर्याच्या बाजुने....

जेव्हा दोन लोकशाही देश एकत्र उभे राहतात, तेव्हा शांततेचा आवाज अधिक मजबूत होतो, असेही पंतप्रधानांनी नमूद केले. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्यासोबत झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर पंतप्रधान मोदींनी ही भूमिका मांडली. या भेटीदरम्यान भारत आणि कॅनडा यांच्यात युरेनियमविषयक ऐतिहासिक करारावर स्वाक्ष-या करण्यात आल्या. याशिवाय, अणुऊर्जा सहकार्य अधिक बळकट करत स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर्स क्षेत्रात दोन्ही देश संयुक्तपणे काम करणार असल्याचेही जाहीर करण्यात आले.

भारतात हिंसाचाराची भीती; दक्षता वाढवली

इराण आणि अमेरिका यांच्यातील सुरू असलेल्या युद्धाबाबत भारत सरकार हाय अलर्टवर आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने राज्यांना पत्र लिहून खबरदारी घेण्याचे आवाहन केल्याचे वृत्त आहे. या पत्रातून सांप्रदायिक हिंसाचाराच्या शक्यतेबद्दल सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांच्या निधनानंतर, भारतातील अनेक शहरांमध्ये निदर्शने सुरू झाली. परदेशातील घटनांचा देशात परिणाम होऊ शकतो. त्यात विशेषतः धार्मिक मेळाव्यांमध्ये होणा-या वक्तृत्वाचा उल्लेख करण्यात आला होता. कायदा आणि सुव्यवस्थेचा बिघाड रोखण्यासाठी जलद गुप्तचर माहिती सामायिक करण्याची आणि वेळेवर कारवाई करण्याची गरज या पत्रात अधोरेखित करण्यात आली होती.

नेतन्याहू यांच्याशी फोनवर चर्चा

यापूर्वी सोमवारी मध्यरात्री पंतप्रधान मोदींनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) वरील पोस्टमध्ये सांगितले की, त्यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याशी फोनवरून संवाद साधला. या चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदींनी लवकरात लवकर शत्रुत्व समाप्त करण्याची गरज असल्यावर भर दिला.

## विविधतेत एकता साधणारे रंगोत्सव

आख्यायिकांमुळे होळीचा आध्यात्मिक अर्थ अधिक गहिरा होतो.

दुसऱ्या दिवशी साजरे होणारे धुलिवंदन म्हणजे रंगांचा मुक्त उत्सव. रंगांची उधळण करताना लोक एकमेकांवरील राग, मत्सर आणि गैरसमज विसरतात. ''रंगात रंग मिसळला की भेद संपतो'' ही भावना या सणातून प्रकर्षाने जाणवते. उत्तर भारतात रंगवाली होली, महाराष्ट्रात धुळवड, बंगालमध्ये दोल पूर्णिमा, गुजरातमध्ये फगवा, तर गोव्यात शिगमो अशा विविध नावांनी हा सण साजरा केला जातो; परंतु आनंदाचा स्वर सर्वत्र समान असतो.

भारताच्या विविध राज्यांमध्ये होळीच्या परंपरा वैशिष्ट्यपूर्ण आहेत. उत्तर प्रदेशातील मथुरा, वृंदावन आणि बरसाना येथे लठमार होळी प्रसिद्ध आहे. स्त्रिया पुरुषांवर काठ्यांनी हलके फटके मारतात आणि पुरुष ढालीने ते झेलतात. ही परंपरा राधा-कृष्णांच्या लीलांशी जोडली जाते. राजस्थानात राजवाड्यांमध्ये शाही पद्धतीने होळी साजरी केली जाते. पारंपरिक नृत्य, मिरवणुका आणि ढोल-नगाऱ्यांच्या गजरात रंगोत्सव साजरा होतो. पंजाबमध्ये होला मोहल्ला हा शौर्याचा उत्सव म्हणून ओळखला जातो. आनंदपूर साहिब येथे निहंग शीख तलवारबाजीचे प्रात्यक्षिक सादर करतात. पश्चिम बंगालमध्ये दोल पूर्णिमा आणि बसंत उत्सव प्रसिद्ध आहे. शांतिनिकेतनमध्ये विद्यार्थ्यांचे नृत्य-गीत वातावरण भारावून टाकते. गुजरातमध्ये लोकनृत्य आणि सामूहिक रंगोत्सव साजरा केला जातो, तर गोव्यात शिगमो उत्सव पारंपरिक लोककलेने नटलेला असतो.

महाराष्ट्रात होळीचा सण ग्रामसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. पहिल्या दिवशी गावाच्या चौकात किंवा मंदिरासमोर होळी उभारली जाते. वयोवृद्धांच्या हस्ते अग्नी प्रज्वलित केला जातो आणि नवीन पिकांची कणसे अर्पण करून समृद्धीची प्रार्थना केली जाते. ग्रामीण भागात महिलांच्या फुगड्या, भारूड, कीर्तन आणि ओव्यांनी वातावरण रंगते. ''फाल्गुन आला रंग घेऊन, मन झाले हसरे गाऊन'' अशा ओव्या गात गावकरी आनंद साजरा करतात. मराठवाडा आणि बीड जिल्ह्यात होळीभोवती सामूहिक मेळावे, लोकनृत्य आणि ढोल-ताशांचा गजर अनुभवायला मिळतो. काही भागांत रंगपंचमीला विशेष रंगोत्सव साजरा होतो. आदिवासी भागात पारंपरिक ढोल-नृत्याचा जल्लोष असतो, तर धनगर समाजात सामूहिक नृत्य आणि पारंपरिक वेशभूषा आकर्षण ठरते. शहरी भागात मित्र-परिवार एकत्र येऊन रंगांचा उत्सव साजरा करतात.

होळीचे महत्त्व साहित्य आणि संगीतामध्येही प्रतिबिंबित होते. हिंदी चित्रपटसृष्टीतील ''रंग बरसे'', ''बलम पिचकारी'', ''होली के दिन दिल खिल जाते हैं'' ही गीते आजही प्रत्येक होळीला रंग चढवतात. मराठीत लोकगीत, भारूड आणि कीर्तनातून फाल्गुनातील आनंद व्यक्त होतो. ''रंग दे बसंती चोला'' या गीतातील ओळी नवचैतन्याचा संदेश देतात.आजच्या काळात होळी पर्यावरणपूरक पद्धतीने साजरी करणे अत्यंत आवश्यक आहे. रासायनिक रंगांऐवजी नैसर्गिक रंगांचा वापर करणे, पाण्याची नासाडी टाळणे आणि सुरक्षिततेची काळजी घेणे गरजेचे आहे. ''निसर्गाशी सुसंवाद ठेवला तरच उत्सव खरा'' ही जाणीव आजच्या पिढीने जपली पाहिजे. आरोग्याची काळजी घेत सुरक्षित रंग वापरणे, वयोवृद्धांचा आदर राखणे आणि जबाबदारीने सण साजरा करणे ही आपली सामाजिक बांधिलकी आहे.

होळी हा विविधतेतून एकता साधणारा सण आहे. धर्म, जात, भाषा यांचे भेद विसरून सर्वजण एकत्र येतात. ''वसुधैव कुटुंबकम्'' या विचाराची प्रचिती या रंगोत्सवातून येते. रंगांची उधळण करताना मनातील द्वेष जाळून टाकण्याची आणि प्रेम, मैत्री, बंधुभाव यांचे रंग आयुष्यात कायम ठेवण्याची प्रेरणा मिळते. ''जाळू या राग, जपू या प्रेम, रंगांनी भरू दे जीवन क्षेम; होळीच्या ज्वालेत दुःख जळो, धुलिवंदनात आनंद फुलो.'' या काव्यमय भावनेतून होळीचा खरा अर्थ उलगडतो. होळी आणि धुलिवंदन हा केवळ सण नाही; तो भारतीय जीवनपद्धतीचा रंगीबेरंगी आरसा आहे. या उत्सवाच्या निमित्ताने सर्वांनी परस्परांतील दुरावा विसरून नव्या उमेदीनं, नव्या आशेने जीवनात रंग भरूया.

आपणा सर्वांना होळी आणि धुलिवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा. रंगोत्सव आपल्या जीवनात आनंद, आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवो.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

## ८ वर्षांच्या तैमूर मोहसीन कुरेशीचा आयुष्यातील पहिला रोजा संपन्न

बीड दि २(प्रतिनिधी)- पवित्र महिन्याच्या पार्श्वभूमीवर बीडचे अल्ट्राटेक सिमेंट बीड चे सीनियर एक्झिक्यूटिव्ह मोहसीन कुरेशी याचा मुलगा तैमूर मोहसीन कुरेशी यांनी वयाच्या आठव्या वर्षी पहिला रोजा पूर्ण केला .लहान वयातही धार्मिक संस्काराची जपणूक करत त्याने पूर्ण दिवस उपास पाळला व घरातील मोठ्या मार्गदर्शनाखाली नमाज आदा करून संध्याकाळी आजान होताच खजूर व पाण्याने रोजा सोडण्यात आला. याबद्दल याच्या सर्व स्तरातून कौतुक होत आहे .


# पार्श्वभूमी


## सौ. के.एस.के.महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाचा प्रेरणा नेतृत्व गुणविकास शिबीरात सहभाग


बीड दि २ (प्रतिनिधी)- राष्ट्रीय सेवा योजना आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास शिबीरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघामध्ये बीड येथील सौ. केएसके महाविद्यालयाचा विद्यार्थी चि. सिध्दार्थ वाघमारे यांनी विद्यापीठ संघाचे नेतृत्व केले. त्याबद्दल त्याचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, डॉ. खान ए.एस., उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, डॉ. यादव घोडके, डॉ. पल्लवी इरलापल्ले, डॉ. सय्यद इमाद, डॉ. बिसेन ए. आर., डॉ. प्रकाश गायकवाड आदी उपस्थित होते.



# गचागचा खाण्यासह ढसाढसा पिण्याचे आज धुळवंडीला सर्वांना मुक्त स्वातंत्र्य

बीड दि २(प्रतिनिधी)- हिंदू धर्मामध्ये जेवढे सण उत्सव आहेत ते सण उत्सव जणू वाटून घेतले आहेत, असे चित्र प्रत्येक सण उत्सवात दिसून येते. त्यापैकीच पिणाऱ्या खाणाऱ्यासाठी धुळवंडीचा एकमेव सण आहे. या सणाला अलीकडे वेगळे वळण लागले असल्याचे दिसून येते. शेकडो बकरे आणि हजारो पक्षाचे बलिदान देऊन त्याचे मांस गचागचा खाण्यासह ढसाढसा पिण्याचे स्वातंत्र्य जणू या सणाला दिसून येते. मध्याच्या आहारी गेलेले कित्येक जण कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करतात. म्हणून यावर लक्ष केंद्रित करण्याचे काम पोलीस यंत्रणेला अगदी पहाटेपासून रात्रीपर्यंत करावे लागते. तेव्हा गचागचा खाण्यासह ढसाढसा पिणाऱ्याने हा सण गावात धांगडधिंगाना न करता शहराबाहेर शांतमय वातावरणात साजरा करणे जरुरीचे आहे.

तसं पाहिलं तर हिंदू धर्मशास्त्रातील एकूण सणापैकी होळी अर्थात धुळवंडीचा शेवटचा सण. धर्मशास्त्रातील जेवढे सण आहे ते प्रत्येकाने जणू वाटून घेतल्याचे दिसून येते. गुढीपाडव्यापासून शास्त्रानुसार नव्या वर्षाची सुरुवात होते. हा सण घराघरात साजरा केला जातो. बैलपोळा सण बैल व शेतकऱ्यांसाठी, संक्रांत व गौरी गणपतीचा सण महिलाचा, गणेशोत्सव तरुण मंडळीचा असे सर्वच सण जणू वाटून दिलेले आहेत. त्यापैकीच धुळवंडीचा सण हा एकमेव सण असा आहे की या सणाला खाणारे आणि पिणारे यांना मुक्त स्वातंत्र्य दिल्याचे दिसून येते. शास्त्राप्रमाणे ३ मार्च रोजी धुलीवंदनाचा सण असल्याने या सणाला वेगळे स्वरूप येत आहे. या सणाच्या दिवशी सरकार मान्य दारू दुकाने, बार बंद असतात. त्यामुळे पिणारे होळीच्या दिवशीच मोठ्या प्रमाणात खरेदी करून ठेवतात. या दिवशी कमी पडली तर अवैध दारूची विक्री करणाऱ्यांचे दुकान त्यांना दिसल्याशिवाय राहत नाही. खाणे आणि पिणे हेच या सणाचे उद्दिष्ट ठरल्याने शेकड्यावर बकरी



आणि हजारो पक्ष्यांचा या दिवशी बळी देऊन त्याच्या मौसाची विक्री होते. मांसाहार करणाऱ्याच्या घरात कोंबडे बकऱ्याशिवाय दुसरं काही शिजतच नाही. एवढंच काय तरुण मंडळी कुठल्यातरी शेतात जाऊन मनसोक्त पार्टी करताना दिसतात. सकाळी एक मेकावर रंगाची उधळण झाल्यानंतर मंडळी यांचे पार्टीकडे लक्ष जाते आणि दुपारी ११ नंतर शहर गाव सामसूम व्हायला सुरुवात होते. असा हा धुळवंडीचा सण साजरा करण्यासाठी मनसोक्त खायला आणि ढोसायला जणू पूर्ण स्वातंत्र्य दिसून येते .मात्र नशाधिन झालेल्या कूणी तरुणांकडून कधी कधी या सणाला गाल बोट लावण्याचा देखील प्रकार होतो. त्यामुळे पोलीस यंत्रणेला या दिवशी मोठा ताण सहन करण्याची वेळ येते .आपल्या घरात सण असताना देखील पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना रस्त्यावर उभे राहून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याची काळजी घ्यावी लागते. तेव्हा सण साजरा करा परंतु कायदा आणि सू व्यवस्थेला गालबोट लागणार नाही याची काळजी घ्या. असे सांगण्याची वेळ आली आहे.

### पोलिसांनो नशेत वाहन चालविणाऱ्यावर कठोर कारवाई करा

नशेमध्ये वाहन चालविल्यास लहान मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. अशावेळी भयानक झालेल्या अपघातातून कुटुंबावर प्रसंग ओडवतात. ते टाळण्यासाठी त्या विरोधात कठोर कायदा आहे. धुळवंडीच्या दिवशी तर नशा करून सुसाट वेगात दुचाकी पळवणाऱ्यांची कमी नसते. अशावेळी पोलिसांनी नेमून दिलेल्या पॉईंटवर लक्ष ठेवून मध्याच्या नसेल वाहन चालविणाऱ्या वर कठोर कारवाई करावी. कुणाचे कितीही वसिले आले तरी याबाबतीत क्षम्य करू नये अशी विनंती देखील सुजान पालकांमधून होताना दिसून आली.

## डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून केज शहरात राबवली स्वच्छता मोहिम

केज दि २ (प्रतिनिधी)- रेवदंडा जि. रायगड येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने रविवा दि. १ मार्च २०२६ रोजी केज शहरात सुमारे १हजार ५०० श्रीसदस्यांनी स्वच्छते साठी रस्त्यावर उतरून अवघ्या चार तासांत संपूर्ण शहरात साफसफाई केली.

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. केज नगरपंचायती च्या सहकार्याने सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत केज शहरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. अभियानास छत्रपती शिवाजीमहाराज चौकातून सुरुवात झाली. चौकाची योग्य आकर्षक रांगोळी काढून स्वच्छता अभियानाला प्रारंभकरण्यात आला. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी तसेच डॉ. सचिन दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव, तुळजापूर, लातूर, बीड, वाशी परिसरातून दीड हजार सदस्य झाडू घेऊन रस्त्यावर स्वच्छतेसाठी उतरले. प्रतिष्ठानतर्फे सदस्यांना हातमोजे, मास्क आदी साहित्य पुरविण्यात आले होते. या अभियानासाठी केज नगरपंचायतीतर्फे १० घंटागाड्या, ३० ट्रॅक्टर तसेच ३ जेसीबी उपलब्ध करून देण्यातआल्या होत्या. या महाअभियाना मध्ये सर्व सदस्यांनी चार तासांत सुमारे ८२ टन सुका कचरा व ४० टन ओला कचरा असा एकूण १२२ टन कचरा संकलित करून तो उचलण्यात आला.या महाअभियाना अंतर्गत केज शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून भवानी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बालाजी मंदिर, जुने केज हनुमान मंदिर परिसर, कळंब रोड, धारूर रोड, कानडी रोड, उमरी रोड सह केज शहरातील रस्ते व प्रमुख शासकीय कार्यालये तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, न्यायालय व विश्रामगृह परिसर स्वच्छ करण्यात आले.या महा स्वच्छता अभियानाने केज शहरातील नागरिकांमध्ये स्वच्छते बद्दल जागृती होण्यास मदत झाली आहे. बाहेर गावचे नागरिक अत्यंत निष्ठा व श्रद्धेने आपल्या गावात येऊन स्वच्छता करताना पाहून केजच्या नागरिकांत स्वच्छतेबद्दल मोठी जनजागृती झाल्याचे दिसून आले. केज नगरपंचायत ने विशेष आभार पत्राद्वारे डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे आभार मानले आहेत.

## श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांच्या पायी दिंडीचे उद्या श्री क्षेत्र पैठण नाथ षष्ठीसाठी प्रस्थान

पिंपळवंडी दि.२(प्रतिनिधी)-श्री.संत एकनाथ महाराज षष्ठी प्रित्यर्थ प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दि.४ ते ८ मार्च दरम्यान पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री शिवपार्वती महादेव



देवालय अश्वत्थलिंग संस्थांनचा पायी दिंडी सोहळा आयोजित केला असून या दिंडी सोहळ्याचे उद्या बुधवार दि.४ मार्च २०२६ रोजी सकाळी ८.३० वा. श्री. क्षेत्र पैठणकडे प्रस्थान होणार आहे. बुधवार दि.४रोजी श्री क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर येथून सकाळी ८.३० वा.पायी दिंडी निघाल्यानंतर पिंपळवंडी येथे सकाळी १०.३०वाजता हनुमान मंदिरात पोहचल्यावर ग्रामस्थांच्या वतीने नाष्टा चहापाणी घेतल्यानंतर अंमळनेर येथील श्री. गणेश मंदिरात आगमन व दुपारी १.३० वाजता भोजन व रात्री पिंपळनेर येथे दिंडी मुक्कामास पोहचेल.दि.५ गुरुवार रोजी पिंपळनेर येथून निघाल्यानंतर टाकळी येथे मुक्काम दि.६ शुक्रवार रोजी तांबेवाडी,सोनोशी मार्गे पायी दिंडी तोंडोली येथे मुक्कामी थांबेल.दि.७ शनिवार रोजी पायी दिंडी शिंगोरी, अंतरवाली मार्गे चापडगाव येथे मुक्कामास थांबेल.व दि.८ रविवार रोजी गदेवाडी,गर्धेवाडी गावाहून पायी दिंडी श्री.क्षेत्र पैठण येथे पोहोचणार आहे.पायी दिंडीच्या मार्गात पायी दिंडी ज्या गावागावातून वस्तीतून जाणार आहे त्या ठिकाणच्या ग्रामस्थांच्या वतीने पायी- दिंडीतील भाविक-भक्त,वारकरी यांच्यासाठी चहापाणी,अल्पोहार, भोजनाची व्यवस्था केलेली आहे. पायी दिंडी मुक्काम ठिकाणी हरिकिर्तन-भजन कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी या धार्मिक कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन संस्थांचे मठाधिपती गुरुवर्य महंत ह भ प महादेवानद भारती महाराज यांनी केले आहे.

## केजची जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी आ.मुंदडांनी विधानसभेत आवाज उठविला केजकर मानणार समारंभ पूर्वक आभार

केज दि २ (प्रतिनिधी) - केजची जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पुन्हा नव्याने सुरु करण्या साठी केजच्या आमदार सौ. नमिताताई मुंदडा यांनी शाळेचा मुद्दा विधानसभेत मांडून केजवासियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल केजवासिय व या शाळेच्या माजी विद्यार्थी संघ यांच्या वतीने अभिनंदन केले असून येत्या सात मार्च रोजी समारंभ पूर्वक आभार मानण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

केज शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ही एकेकाळी शहरातील एकमेव वैभवप्राप्त शाळा होती. मात्र अलीकडील काळात खाजगी शिक्षण संस्थांचे वाढते वर्चस्व व केजच्या नागरिकांचे शाळेकडे नकळत झालेले दुर्लक्ष यामुळे शाळा मोडकळीस आली होती. विद्यार्थी संख्या अभावी शाळा बंद करण्याचा निर्णय शासन स्तरावर चालू असतानाच सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी शाळेच्या गतवैभवाचा इतिहास व सद्यस्थिती याबद्दल सोशल मीडिया वर जागृती केल्यानंतर शाळेचे माजी विद्यार्थी भाई मोहन गुंड, सुनिलहुलसूळकर, अभय कुलकर्णी, तय्यब शेख, गणेश सुरवसे व शेकडो माजी विद्यार्थी यांनी २६ जानेवारी २०२६ रोजी शाळेच्या प्रांगणात भव्य मेळावा व प्रभातफेरी काढून शाळा पुन्हा नव्याने सूरु करण्याचा निर्धार केला आहे. शाळा पुन्हा नव्याने सुरु करण्या साठी जोरदार तयारी सूरू असून आता स्वतः आमदार नमिताताई मुंदडा यांनी पुढाकार घेवून शाळेला भेडसावणाऱ्या समस्या विधानसभा सभागृहात मांडल्याने आता येथील सामान्य व गरीब विद्यार्थ्यांसाठी या शाळेचे दरवाजे येत्या जून २०२६ पासून उघडणार आहेत.आ.सौ. नमिताताई मुंदडा यांनी शासन दरबारी शाळेच्या समस्या मांडल्याबद्दल त्यांचे दि. ७ मार्च रोजी केज येथे आगमनाच्या निमित्ताने केज पंचायत समिती येथे त्यांचा छोटेखानी कार्यक्रमात सत्कार करून आभार व्यक्त करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, भाई मोहन गुंड, समीर देशपांडे, पिंटू दांगट, अहमद इनामदार, जॅकी इनामदार यांनी कळवले आहे.

## सौ. के.एस. के.मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

बीड दि २ (प्रतिनिधी) –येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी भाषा गौरव दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन कार्यक्रमाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी मराठी भाषेचे महत्व पटवून दिले. यावेळी विद्यार्थ्यांनी आणि उपस्थित प्राध्यापकांनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे वाचन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन डॉ. बालासाहेब कटारे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. रामनाथ वाढे यांनी केले.

## केज नगरपंचायत आयोजित स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

केज दि २ (प्रतिनिधी) - केज नगरपंचायत च्या वतीने शहरातील जय भवानी कन्या शाळा यैथे संपन्न झालेल्या निबंध व चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण मुख्याध्यापक पीएम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष डॉ.सौ. सीताताई बनसोड, युवा नेते रणजीतदादा आडसकर, शाळेचे ज्येष्ठ शिक्षक खुळे के. व्ही. यांची प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी चित्रकला, स्पर्धेतून निबंध स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. निबंध स्पर्धेमध्ये अनुक्रमे प्रथम तांबवेकर भावना दत्तात्रय व वर्ग नववा, द्वितीय निकम मानसी मेघराज वर्ग सातवा, व तृतीय लांडगे सई दिनेश वर्ग सहावा तर चित्रकला स्पर्धेमध्ये अनुक्रमे प्रथम नाईकनवरे ऋतुजा तुकाराम वर्ग सातवा, द्वितीय सय्यद आयेशा फिरोज वर्ग आठवा, व तृतीय चौरे अमृता श्रीकृष्ण वर्ग पाचवा या विद्यार्थिनीचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.यानंतर शाळेच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक पी.एम देशमुख यांनी प्रास्ताविक केले. नगराध्यक्ष डॉ. सौ. सीताताई बनसोड यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना मुलींनी प्रत्येक क्षेत्रात आगेकूच करावी असे आवाहन केले. यावेळी इतर मान्यवरांची देखील भाषणे झाली.आभार प्रदर्शन शाळे तील ज्येष्ठ शिक्षक खुळे के. व्ही यांनी केले. यावेळी त्यांनी शाळेच्या विकासासाठी विद्यार्थी पालक व शिक्षण प्रेमी त्याचप्रमाणे रणजीत भैया आडसकर यांची सातत्याने पाठबळ मिळत असते म्हणूनच आम्ही शाळेमध्ये वेगळे उपक्रम राबवू शकतो असे सांगितले व कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गिरी एस.एम यांनी केले तर कार्यक्रमाचा समारोप शिंदे बी.एम यांनी केला.

## नाथषष्टीसाठी संत बंकटस्वामी महाराज दिंडीचे होणार उद्या पैठणकडे प्रयान

नेकनुर दि २( प्रतिनिधी) बीड तालुक्यातील ७७ वर्षाची अखंड परंपरा



असलेल्या संत बंकटस्वामी महाराज यांच्या पालखीसह दिंडीचे बुधवार दि ४ मार्च रोजी श्रीक्षेत्र नेकनूर येथून श्री क्षेत्र पैठण कडे प्रस्थान होणारं आहे. यां दिंडीत सर्व भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले आहे.

संत एकनाथ महाराजांच्या जलसमाधी सोहळ्या निमित्त श्री क्षेत्र पैठण येथील नाथषष्ठी यात्रेसाठी बीडच्या श्री क्षेत्र निनगूर येथून पालखीसह दिंडी सोहळ्याचे प्रस्थान होणार आहे.वारकरी संप्रदायातील महान संत बंकट स्वामी महाराज यांचे शिष्य संत वै.संत सुदामदेव महाराज यांनी सुरू केलेल्या पालखी सह दिंडी सोहळयाचे या वर्षीचे ७७ वे वर्ष आहे. वैकुंठवासी रामहरी महाराज,वै. दिगंबर महाराज, यांनी परंपरा अखंड पणे चालवली.आज तीच परंपरा समर्थपणे महंत लक्ष्मण महाराज मेंगडे चालवत आहेत.. यां दिंडीत मराठावाड्यातून हजारो वारकरी सहभागी होतात.मुक्काम दर कोस दर मजल पाई प्रवास करून पंचमी दिवशी दिंडी पैठण मध्ये पोचते. षष्ठीच्या सोहळ्यामध्ये भजन,कीर्तन,भारुड,संगीत भजन आदी कार्यक्रम संपन्न होतात जेवणाची आणि राहण्याची मोफत व्यवस्था संस्थान च्या वतीने केली जाते. त्यामुळे दिंडी सोहळ्या मध्ये हजारो भावीक भक्तानी सहभागी व्हावे असे आवाहन महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले आहे.

## यूनिक क्युरियस किड्स स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन संपन्न

परळी दि २(प्रतिनिधी)- यूनिक क्युरियस किड्स स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञान मेळाव्यातील विज्ञान प्रदर्शनात शाळेतील तब्बल ९७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध विषयांवर आकर्षक आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विविध बक्षिसेही पटकावली.

विशेष म्हणजे, लहानग्या चिमुकल्यांनी आपल्या प्रकल्पांचे स्पष्ट, आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी स्पष्टीकरण देत उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या जिज्ञासू वृत्तीने आणि सादरीकरण कौशल्याने उपस्थित पालक आश्चर्यचकित झाले व अभिमानाने भारावून गेले.या कार्यक्रमासाठी परीक्षक व प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका डॉ. पूजा तोतला मॅडम, सौ. रुची ठक्कर मॅडम आणि सौ. आकांक्षा सेठिया मॅडम व सौ. शीतल पंपालिया मैडम उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.शाळेच्या संचालिका सौ. पूजा सारडा मॅडम तसेच सर्व शिक्षकवृंदांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

# धारूरच्या आरूष अबॅकस क्लासेसची कु.आरोही रोहित निकते देशात प्रथम

किल्ले धारूर दि २ (प्रतिनिधी)- येथील आरूष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेसची विद्यार्थिनी कुमारी आरोही रोहित निकते हिने देशात प्रथम क्रमांक मिळवल्याने शहरासह तालुक्याची मानून चावली आहे.

दिनांक २७ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या प्रोऍक्टिव्ह अबॅकसच्या राष्ट्रीय स्पर्धेत देशातील विविध राज्यांमधील जवळपास ३ हजार विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या देशपातळीवरील स्पर्धेत किल्ले धारूर येथील आरूष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेसचे २३ विद्यार्थी सहभागी झाले होते.त्यापैकी तब्बल १४ विद्यार्थ्यांनी रँक मिळवून क्लासेस व धारूर शहराचे नाव उज्ज्वल केले.यामध्य विद्यार्थिनी आरोही रोहित निकते हिने अवघ्या ५ मिनिटांत १०० पैकी १०० गणिते अचूक सोडवून देशात प्रथम क्रमांक पटकावला.

तिच्या या नेत्रदीपक यशाबद्दल तिला ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि सायकल देऊन सन्मानित करण्यात आले. तिच्या या कामगिरीमुळे क्लासेस ची व संपूर्ण धारूर शहराची मान उंचावली आहे.या स्पर्धेत आरोही निकते,वरद शिवप्रसाद तोष्णीवाल, वैष्णवी रणजीत सोळंके, श्रावणी संतोष आदमाने, श्रेया सुंदर जायभाये, अधिरा मोहन जाधव यांच्यासह एकूण ८ विद्यार्थी प्रथम ते चवदाच्या क्रमांकावर आले. तर ९ सहभागी विद्यार्थ्यांना "बेस्ट परफॉर्मर" ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रोऍक्टिव्ह अबॅकसचे सर्वेसर्वा गिरीश करडे सर, सारिका करडे मॅडम तसेच आरूष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेसचे संचालक प्रा.अविनाश जगताप व संचालिका शीतल जगताप मॅडम यांनी कौतुक केले.सर्व पालक व धारूर येथील शिक्षणप्रेमींकडून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची जिद्द, पालकांचे सातत्यपूर्ण सहकार्य आणि मार्गदर्शक शिक्षकांचे नियोजनबद्ध प्रशिक्षण हे महत्त्वाचे घटक असल्याचे क्लासेस चे संचालक प्रा.अविनाश जगताप यांनी सांगितले.

## महेश सिनियर सिटीझन ग्रुपच्या वतीने तहानलेल्यासाठी पाणपोई चे उद्घाटन

परळी दि २ (प्रतिनिधी)- उन्हाळ्याची चाहूल लागत असताना शहरातील प्रमुख ठिकाण मोंढा मार्केट येथील हनुमान मंदिरा समोर महेश सिनियर सिटीझन ग्रुप च्या वतीने रविवार १ मार्च रोजी नगराध्यक्ष अशोक पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी व बाजीराव भैया धर्माधिकारी यांच्या हस्ते तहानलेल्यांची सेवा घडवण्यासाठी पाणपोई सुरू करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया हे होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानोबा माऊली फड, जयपाल लाहोटी, सौ. शिल्पा जयपाल लाहोटी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महेश सिनियर सिटीझन ग्रुपचे अध्यक्ष पांडुरंग सोनी यांनी आपल्या प्रास्ताविकात सीनियर ग्रुप ने केलेले आतापर्यंतच्या कामाची माहिती विशद केली सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी बोलताना पाणपोई मुळे मोंढा मार्केट मध्ये येणाऱ्या परळी पंचक्रोशीतील ग्रामस्थ तसेच मंदिरात येणाऱ्या भाविकांना उन्हाळ्यात थंड पाण्याने निश्चितच दिलासा मिळणार असल्याचे नमूद केले. यावेळी इतर मान्यवरांची ही भाषणे झाली. अध्यक्षीय समारोप जुगलकिशोर लोहिया यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रुपचे सहसचिव प्रा. बैजुलाल भंडारी यांनी तर ओमप्रकाश भुतडा यांनी आभार व्यक्त केले.

## संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये मराठी दिन उत्साहात साजरा

बीड दि २ (प्रतिनिधी)- संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये या स्कूलचे मुख्याध्यापक परजणे सर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कल्पना देव उपस्थित होत्या. अध्यक्ष व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी कल्पना देव यांनी आपल्या भाषणात कुसुमाग्रज यांच्या जीवनचरित्राविषयी माहिती दिली. मराठी भाषा ही बोलीभाषा व प्राकृत भाषा कशी आहे, तसेच मराठी भाषा इतर भाषांना कशी सामावून घेते, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.मराठी दिनाचे औचित्य साधून इयत्ता १ ली ते ९ वी मधील विद्यार्थ्यांनी प्रदर्शन भरविले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवर डॉ. जिंतुरकर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतः केलेल्या उपक्रमांविषयी मान्यवर, शिक्षक व विद्यार्थ्यांसमोर सुंदर माहिती सादर केली. देशमुख सर यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे सादरीकरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन निमगांवकर यांनी केले तसेच आभार प्रदर्शनही निमगांवकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता महाराष्ट्र राज्यगीताने झाली. अशा प्रकारे विविध कार्यक्रमांनी सजलेला मराठी दिनाचा हा सोहळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडला.

## प्रगती विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

बीड दि२(प्रतिनिधी)- प्रगती विद्यालय बालेपीर बीड या शाळेमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त , विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयावर व्याख्याने व विज्ञान प्रदर्शन घेण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सौ सत्यभामाताई बांगर तर प्रमुख अतिथी बीड जिल्हा मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष घाडगे एस. बी. सर, डॉक्टर तिडके शिवाजीराव सर, प्राध्यापक शेरकर सर व जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक कंठाळे सर, केंद्रप्रमुख संभाजी सोनवणे सर हे होते प्रथमतः सी वी रमण व सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली प्रथमतः विद्यालयाचे मुख्याध्यापक कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्री गोपाळघरे सर यांनी अध्यक्ष व प्रमुख अतिथीचे हार ,शाल, श्रीफळ देऊन स्वागत केले. प्रमुख अतिथी घाडगे सर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ विचारसरणी विकसित करण्याचे आवाहन केले .शेवटी अध्यक्षीय भाषणात बांगर ताई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विज्ञानामुळे शेती उद्योग अवकाश संशोधन माहिती व तंत्रज्ञान आधी क्षेत्रात झालेली प्रगती ही विज्ञानाची देणगी असल्याचे नमूद केले आहे, कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने विज्ञान दिनाच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत हातभार लावावा असा संकल्प करावा तसेच प्राध्यापक शेरकर, सर सानप बी. आर .सर ,कु माने सरयु , कु गरजे श्रेया, कु घुगे समृद्धी यांनी आपले मत व्यक्त केले , प्रास्ताविक पर भाषण वाघवाले.सर यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानप एस यु सर यांनी केले शेवटीआभार शेख सर यांनी मानले...

## एनएमएमएस परीक्षेतील यशाबद्दल वाघेबाबुळगाव जि.प.(अनू) माध्यमिक शाळेचे विद्यार्थी सत्कारित

नांदूर घाट दि २ (प्रतिनिधी)- तालुक्यातील वाघे बाभुळगाव येथील जि. प. (अनु.) माध्यमिक शाळा वाघेबाभुळगाव मधील नवू विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक अर्थात एन एम एम एस परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तसे राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा विशेष सत्कार करण्यात आला.

शाळेचे मुख्याध्यापक धनगर सर यांच्या अध्यक्षतेखाली शाळेत घेण्यात आलेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सदस्य प्रेमचंद कोकाटे, माजी सरपंच रामदासजी वाघ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप झांबरे, केंद्रीय प्राथमिक शाळेचे शा.व्य.स. उपाध्यक्ष गणेश भोजने, राजेभाऊ हांडगे, बाळासाहेब जाधव व गणेश हावळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या परीक्षेत १. आरती रामराव बिक्कड, २. आरुषी रामदास वाघ, ३. सानिका विलास नेहरकर, ४. श्वेता दत्ता सोनके,५. सृष्टी संतोष जाधव,६. श्रवण संदीप इंगोले,७. शिवतेज परमेश्वर स्वामी,८. कु. श्रद्धा किरण जाधव,९. कु. अक्षरा रमेश पंडित या विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्याबद्दल त्यांच्यासोबत त्यांच्या पालकांचा मुख्याध्यापक व शिक्षक वृंद आणि प्रमुख मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. शाळेचे शिक्षक ढेंगळे सर, श्रीमती. राख मॅडम, डोईफोडे सर व आरकडे सर यांनी स्पर्धा परीक्षेचे महत्त्व पटवून दिले.

# संपादकीय

## मुलांना तणावमुक्त ठेवा

मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या अशा बारावी-दहावी परीक्षा राज्यात सुरू झाल्या आहेत. या परीक्षेच्या कार्यकाळात मुलं अभ्यासाच्या तणावातून जात असतात. तेव्हा पालकांनी मुलांच्या आरोग्याकडे बारकाईने लक्ष द्यावयास हवे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून राज्यात सुरू झाली आहे. या परीक्षा पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण अशा ९ विभागीय मंडळांच्या मदतीने घेत असतात. बारावीच्या परीक्षेत आतापर्यंत १०९ गैरप्रकार झाले असून कोकण विभागीय मंडळामध्ये एकही गैरप्रकार झालेला नाही. तेव्हा परीक्षा मंडळाने अधिक दक्ष राहणे आवश्यक आहे. दोन्ही परीक्षा मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेत. पालकांनी मुलांच्या तणावाच्या लक्षणाकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे. म्हणजे त्यांना परीक्षाकाळात तणावमुक्त परीक्षा देता येईल. त्यासाठी पालकांनी परीक्षेच्या कार्यकाळात परीक्षा सुरू असताना मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे. परीक्षेचे वेळापत्रक जसजसे जवळ येते तसतसे मुलांचा ताण वाढण्याला मदत होत असते. जी मुले नियमित अभ्यास करतात त्यांना कोणत्याही प्रकारचा ताण जाणवत नाही. तेव्हा आई-वडिलांनी मुलांची केवळ परीक्षेपुरती काळजी न घेता नियमितपणे काळजी घेतली पाहिजे. बऱ्याच वेळा परीक्षा जवळ आली की मुलांची डोकेदुखी, पोटदुखी, अंगदुखी, झोप न येणे, मूल चिडचिडे होणे असे दिसून येते. अशा वेळी पालकांनी मुलांना विश्वासात घेऊन सकारात्मक दृष्टिकोन मुलांबरोबर ठेवावा. याचा परिणाम म्हणून त्यांना प्रोत्साहन मिळून ती अधिक जोमाने अभ्यास करून तणावमुक्त होऊन परीक्षेला आनंदाने सामोरे जातील. पालकांनी आपली मुले परीक्षेत यशवंत होण्यासाठी परीक्षेच्या कालावधीत मुलांच्या मनात तणाव वाढणार नाही याची काळजी घ्यावी. तेव्हा मुलांच्या अभ्यासातील प्रगतीचा भूतकाळ कसा होता किंवा त्यांनी काय केले याची उजळणी न करता त्यांच्या भविष्याचा विचार करून त्यांच्याशी सुसंवाद साधावा. मुलांच्या परीक्षेविषयी त्यांच्या मनातील भीती दूर करावी. त्यांना आनंदित ठेवावे. पालकांनी अभ्यासासाठी जास्त सक्ती करू नये. मुलांनासुद्धा आपल्या परीने अभ्यास करू द्यावा. तेव्हा आपल्यावरती आता धाक नाही असे मुलांनी न समजता अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. यात आपलेच नुकसान होणार आहे, याची मुलांनी दक्षता घ्यावी. यासाठी मुलांनी आज्ञाधारक राहिले पाहिजे. महत्त्वाची बाब म्हणजे, आपले मूल परीक्षेच्या काळात पुरेसे जेवण करीत आहे का? याकडे सुद्धा पालकांनी लक्ष द्यायला हवे. मुलांची बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी त्यांचे आरोग्य चांगले असावे लागते. त्यासाठी त्यांना संतुलित आहार नियमित मिळणे आवश्यक आहे. म्हणजे त्यांची ऊर्जा टिकून राहते. परीक्षा काळात मुलांच्या जेवणात बदल करू नये. तसेच त्यांना पुरेशी झोप घेण्यास सहकार्य करावे. मुलांना पुरेशी झोप मिळाल्यामुळे ते अधिक एकाग्रतेने अभ्यास करू शकतात. त्यात टीव्ही पाहणे आणि आरोग्यासाठी व्यायाम अतिशय महत्त्वाचा असतो. काही पालक रात्रभर अभ्यास करा असे मुलांना सांगत असतात किंवा अभ्यासिकेत पाठविले जाते. अशा वेळी पालकांनी सुद्धा मुलांचा कल लक्षात घेणे गरजेचे असते. कारण इतरांपेक्षा आपल्या मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहिती असतात. अभ्यासाबरोबर आरामाचीसुद्धा मुलांना नितांत आवश्यकता असते. याकडे सुद्धा पालकांनी अधिक लक्ष द्यायला हवे. याचा जास्त फायदा आपल्या मुलांना होत असतो. याची कल्पना पालकांना असायला हवी. अभ्यासाबरोबर घराचीसुद्धा स्वच्छता जास्त महत्त्वाची असते. त्याचबरोबर पालकांनी स्वत: शांत राहणे महत्त्वाचे असते. परीक्षा काय दररोज होत नाहीत. मात्र परीक्षेचा काळ मुलांप्रमाणे पालकांसाठीही महत्त्वाचा असतो. या कार्यकाळात मुलांना तणावमुक्त होण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे असते, मात्र यात जास्त वेळ घालवू नये. मुलांच्या अभ्यासासाठी कशी मदत होईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. यात जास्त वेळ घालवू नये. परीक्षेच्या काळात मुलांचा ताण वाढल्यास मुलांनी त्याचा सामना कसा करावा याचा योग्य सल्ला घ्यावा. या काळात मुलांना अभ्यास करताना व्यत्यय येणार नाही याची पालकांनी काळजी घ्यावी. आरामात अभ्यास करेल अशा जागेत त्याला अभ्यास करण्यासाठी बसवावे. परीक्षा सुरू असल्याने आपल्या मुलांना प्रेरित करण्यासाठी प्रोत्साहित करावे. विद्यार्थी आणि परीक्षा यांचा कसा सबंध असतो. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यावर आपले ध्येय सहज पार करू शकतो याची आठवण मुलांना करून द्यावी. काही वेळा परीक्षा काळात मुलांना चिंताग्रस्त होणे साहजिकच आहे. मात्र सकारात्मक दृष्टिकोन मुलांनी ठेवायला पाहिजे. ही नैसर्गिक प्रतिक्रिया असून त्यावर सहज मात करता आली पाहिजे. यासाठी वर्षभरात झालेला अभ्यास दरदिवशी करणे आवश्यक आहे. अभ्यास झाला असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता अधूनमधून अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. म्हणजे त्या अभ्यासक्रमाची उजळणी होऊन मुलांच्या मनात तणाव निर्माण होत नाही. यात अभ्यासात चुकारपणा मुलांनी करू नये. अभ्यासासाठी मुलांवर दबाव वाढवू नये तर मुलांच्या समस्या सुद्धा पालकांनी समजून घेणे गरजेचे असते. परीक्षा झाल्यावर पेपरमध्ये कठीण प्रश्न कोणते होते? किती लिहिलाय? पेपर पूर्ण लिहिलाय काय? असे अनेक प्रश्न विचारत बसण्यापेक्षा आता पुढील परीक्षा कोणत्या विषयाची आहे. त्या विषयावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. परीक्षेला घरातून जाताना मुलांना आधार दिला पाहिजे. तसेच त्यांना धीर द्यावा म्हणजे मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त परीक्षा देऊ शकतात. तेव्हा मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त होण्यासाठी पालकांनी प्रोत्साहन द्यावे.

# नशा मुक्त भारत अंतर्गत तंबाखूजन्य पदार्थांची व नशांच्या पदार्थांची होळी

बीड दि २(प्रतिनिधी)- शहरातील संस्कृती विद्यालय नगर रोड येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीडल,नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य , जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने तंबाखूजन्य पदार्थांची प्रतिकात्मक होळी करण्यात आली यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दत्ता नलावडे ,तत्त्वशील कांबळे ज्योती गायकवाड आदी उपस्थित होते.

समाजामधील युवकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाचे प्रमाण वाढत आहेत जाहिरातीच्या माध्यमातून व्यसनाकडे युवकांचे आकर्षण वाढत आहे व्यसनामुळे समाजामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे त्यामुळे किशोरवयीन वयामध्ये बालकांना व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगणे गरजेचे आहे



मुळातच व्यसनच लागू नये याकरिता शाळा महाविद्यालयामध्ये प्रयत्न करणे खूप गरजेचे आहे विद्यार्थी ,महिला व युवकांमध्ये वाढते व्यसनाचे व तंबाखूचे प्रमाण हे जीवनास हानिकारक आहे कॅन्सरचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे किशोरवयीन बालके ही विविध प्रकारचे व्यसन करत आहेत व्यसनाचे दुष्परिणाम जीवनात खूप ठिकाणी जाणवत आहे ते कमी व्हावे म्हणून प्रत्येक माणसाने आपल्या जीवनात व्यसन बंद केले पाहिजे त्यामुळे जे जे व्यसन करतात त्यांनी होळीच्या दिवशी आपल्या जीवनातील व्यसनांचा नाश करणे गरजेचे आहे व्यसन सोडून चांगली जीवनाला सुरुवात करावी असे आवाहन यावेळी तत्त्वशील कांबळे यांनी केले. यावेळी दत्ता नलावडे यांनी विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थ व व्यसनी पदार्थापासून दूर राहण्यासंबंधीचे मार्गदर्शन केले होळी दिवशी सर्वांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

# मुख्याध्यापक तांदळे सर यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा संपन्न



बीड दि.२( प्रतिनिधी)- तालुक्यातील वडगाव हायस्कूल वडगाव गुंधाचे मुख्याध्यापक तांदळे एस.टी. हे नियतवयोमानुसार ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. २८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा शाळेच्या वतीने सेवापूर्ती सन्मान सोळा संपन्न झाला.कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थी, जाधव एम. सी, डॉ. शिल्पा तांदळे, श्रीमती मोरे, दामोदर तांदळे, केशव भांगे, डॉ.स्वप्नील तांदळे, अरुण बोंगाणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना सुधाकर तांदळे म्हणाले की, स्व. काकू - नाना, मचाले मामा, यांनी कुटुंबातील सदस्य प्रमाणे प्रेम, प्रतिष्ठा, दिली असे सांगून माजी मंत्री जयदत्त अण्णा, डॉ.राजा मचाले, योगेश पवार यांनी माझा दीपस्तंभा प्रमाणे सांभाळ करून वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांचे माझ्यावर आणि माझ्या कुटुंबावर अनंत उपकार आहेत त्यांच्या उपकाराची मी परतफेड करू शकत नाही अध्यक्षीय समारोपात बोलताना डॉ. राजा मचाले म्हणाले की, स्व. काकूंनी लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले असून त्यांचा वारसा माजी मंत्री जयदत्त अण्णा हे खंबीरपणे चालवत आहेत यावेळी प्रकाश राठोड, परमेश्वर धारकर, सुधाकर नागरगोजे, विक्रम नागरगोजे, आसाराम नागरगोजे, सुमंत गव्हाणे, नितीन नागरगोजे, किसन गव्हाणे, व्ही. आर. शिंदे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# ज्योती आरकडे-मस्के यांना 'उत्कृष्ट अधिपरिचारिका' पुरस्कार प्रधान



केज दि २ (प्रतिनीधी)-राष्ट्रीय पत्रकार संघ, मराठी पत्रकार परिषद व पुरोगामी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अधिपरिचारिका ज्योती विलासराव आरकडे-मस्के यांना उत्कृष्ट अधिपरिचारिका पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आरोग्य क्षेत्रात अनेक वर्षे निष्ठा, समर्पण आणि सेवाभावाने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

ज्योती आरकडे-मस्के यांनी उपजिल्हा रुग्णालय केज, ग्रामीण रुग्णालय धारूर, ग्रामीण रुग्णालय भोकर (जि. नांदेड) तसेच जिल्हा रुग्णालय बीड येथील मोबाईल टीममध्ये महत्त्वपूर्ण सेवा बजावली आहे. शस्त्रक्रिया गृहात कार्य करताना त्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मोबाईल टीमसोबत जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये आयोजित शस्त्रक्रियांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. सध्या त्या स्त्री रुग्णालय, लोखंडीसावरगाव येथे अधिपरिचारिका म्हणून कार्यरत असून आतापर्यंत १० हजारांहून अधिक शस्त्रक्रियांमध्ये असिस्टंट म्हणून काम केले आहे. याशिवाय जवळपास ५ हजार मोतीबिंदू शस्त्रक्रियांमध्ये त्यांनी सहाय्यक म्हणून योगदान दिले आहे.केज तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांसह आडस, बनसारोळा, अंबाजोगाई येथील धानोरा ग्रामीण रुग्णालय तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील वाशी ग्रामीण रुग्णालय येथे जाऊन कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया मोहिमांमध्ये त्यांनी उल्लेखनीय सहभाग नोंदवला.आरोग्य सेवेत रुग्णांप्रती असलेली बांधिलकी, कर्तव्यनिष्ठा आणि सातत्यपूर्ण सेवा यामुळेच त्यांना हा सन्मान मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण भागातील हजारो रुग्णांना वेळेत उपचार व शस्त्रक्रियेचा लाभ मिळाला आहे

# अंबाजोगाईत पोलीस पाटील भरती पूर्णपणे पारदर्शक कोणीही अफवांवर विश्वास ठेवू नये- दिपक वजाळे

अंबाजोगाई दि २(प्रतिनिधी)- अंबाजोगाई उपविभागामध्ये सुरू असलेली पोलीस पाटील भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि गुणवत्तेच्या आधारावर राबवली जात असल्याची ग्वाही उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांनी दिली आहे. लेखी परीक्षेनंतर आता पात्र उमेदवारांच्या मुलाखतीची प्रक्रिया सुरू झाली असून, या संपूर्ण प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार होणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



निवडीचा मुख्य निकष केवळ गुणवत्ता हाच असल्याने उमेदवारांनी किंवा त्यांच्या पालकांनी फसवणूक करणाऱ्या मध्यस्थांच्या कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.भरती प्रक्रियेच्या नावाखाली काही समाजकंटक दिशाभूल करण्याची शक्यता असून अशा अफवांकडे दुर्लक्ष करून उमेदवारांनी केवळ आपल्या कष्टावर लक्ष केंद्रित करावे. कोणाकडूनही पैशांची मागणी झाल्यास उमेदवारांनी तत्काळ तक्रार नोंदवावी. उमेदवारांचे शिक्षण, लेखी परीक्षा आणि मुलाखत यांच्या एकत्रित गुणांच्या आधारावरच अंतिम निवड केली जाणार आहे. गावपातळीवरील या अत्यंत महत्त्वाच्या पदासाठी पात्र आणि गुणवंत उमेदवारांची निवड कोणत्याही दबावाशिवाय केली जाईल, असे वजाळे यांनी नमूद केले आहे.

## सेवानिवृत्त फौजदार किरण असरडोहकर यांचे निधन



अंबाजोगाई दि २( प्रतिनिधी) -येथील मूळ रहिवासी आणि पुणे येथे स्थायिक असलेले सेवा निवृत्त पोलीस वायरलेस खात्यातील पोलीस उपनिरीक्षक श्रीयुत किरण रामराव असरडोहकर यांचे आज रविवारी सकाळी पहाटे साडेतीन वाजता हृदयविकाराच्या झटक्याने पुणे येथील एका खाजगी रुग्णालयात दुःखद निधन झाले. ते ६६ वर्षांची होते, त्यांच्या पाश्चात पत्नी, विवाहित मुलगा, विवाहित मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. अंबाजोगाई येथील श्री योगेश्वरी महाविद्यालयाचे ते माजी विद्यार्थी होते . श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी कार्यकारिणी सदस्य आणि सेवानिवृत्त अभियंता उदय असरडोहकर आणि ज्येष्ठ नागरिक अरुण असरडोहकर यांचे ते कनिष्ठ बंधू होते. पुणे येथील नांदेड सिटी जवळील शिवणी स्मशानभूमीत रविवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## डोंगरकिन्ही येथील माजी विद्यार्थ्यांची हरिनाम सप्ताहासाठी ३७,७७७ रु



डोंगरकिन्ही दि २(प्रतिनिधी) -पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथील संत वामनभाऊ महाराज मंदीर प्रतिष्ठानच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी व विकास कामांसाठी जि.प. माध्यमिक शाळेच्या १९९९ च्या माजी विद्यार्थ्यांनी संघटीत होऊन मदतीचा हात पुढे करत एकूण ३७,७७७ रु रोख देणगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष चेअरमन हनुमंतराव येवले यांच्या कडे सप्ताह समाप्ती प्रसंगी सुपूर्द केली आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या देणगी बद्दल प्रतिष्ठानच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करुन आभार व्यक्त करण्यात आले. विशेष बाब म्हणजे गेल्या २९ वर्षापासून सुरू असलेल्या या सप्ताह कार्यक्रमास लाखो रु देणगी व अन्नदान हे स्वखुशीने भाविक देत असतात. प्रतिष्ठानच्या वतीने देणगी साठी आग्रह केला जात नाही. विद्यार्थ्यांनी स्वखुशीने दिलेल्या देणगीचे पंचक्रोशीतून कौतुक होत आहे.

# मुस्लिम अल्पसंख्याकांवरील अत्याचारांविरोधात पत्रकार आरेफ सिद्दिकी यांचे राष्ट्रपतींकडे निवेदन

आंबेजोगाई दि २ (प्रतिनिधी)- देशातील विविध राज्यांमध्ये मुस्लिम अल्पसंख्याक समाजावर होत असलेल्या कथित अत्याचार व भेदभावपूर्ण कारवायांविरोधात कठोर पावले उचलावीत, तसेच संविधानिक हक्कांचे संरक्षण करावे, या मागणीसाठी महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पत्रकार आरेफ सिद्दिकी यांनी निवेदन सादर केला.

भारत सरकार, नवी दिल्ली यांना उद्देशून तयार करण्यात आलेले हे निवेदन माननीय जिलाधिकारी कार्यालय, बीड यांच्या मार्फत पुढे पाठविण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, काही राज्यांमध्ये धार्मिक आधारावर भेदभाव, अन्यायकारक कारवाया व सामाजिक तणाव वाढत असल्याच्या घटना समोर येत आहेत. या



घटनांमुळे संबंधित समाजामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.निवेदनकर्त्यांनी केंद्र सरकारने संबंधित राज्य सरकारांकडून सविस्तर अहवाल मागवून वस्तुस्थितीची चौकशी करावी, तसेच दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य व संरक्षण दिले असून, त्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.यासोबतच, अल्पसंख्याक समाजाच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना राबवून सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी जनजागृती कार्यक्रम हाती घ्यावेत, अशी सूचना करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार शेतकरी विरोधी कायद्यांची होळी करत सरकारच्या नावाने बोंबा ठोकल्या

बीड दि २(प्रतिनिधी)- एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारत देशात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यात महाराष्ट्र राज्यात ३८.५ टक्के प्रमाण असुन महाराष्ट्र पहिल्या स्थानावर आहे. मराठवाड्यात गेल्या सन २०२५ वर्षात ११२९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यात २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नव वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी आत्महत्यांची नोंद आहे. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे आणि शेतकरी विरोधी कायद्यांमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे.याच्या निषेधार्थ आणि शेतकऱ्यांचे आर्थिक जिवनमान उंचावत शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एनडीपीएस कायद्यात बदल करून शेतकऱ्यांना गांजा,अफु,तंबाखु लागवडीसाठी रीतसर परवानगी देण्यात यावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२ मार्च होळी दिवशी सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकरी विरोधी कायद्यांची होळी करत सरकार विरोधी धोरणांच्या निषेधार्थ बोंबा ठोकत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

निवेदन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे,शेख मुबीन, बाळासाहेब मोरे पाटील,माजी सैनिक अशोक येडे,रामधन जमाले, कुलदीप करपे, सुहास जायभाये, डॉ.संजय तांदळे , प्राचार्य डी.जी.तांदळे,प्रा.कॉ. विठ्ठलराव सवासे, प्रभाकर धुमाळ, राजेंद्र धुमाळ,माऊली शिंदे जिल्हा सदस्य आम आदमी पार्टी बीड आदी सहभागी होते.

# बीड तालुक्यात कॉपीमुक्त वातावरणात दहावी व बारावी बोर्डाच्या परिक्षा सुरु

बीड (प्रतिनिधी)- बीड शहरासह तालुक्यामध्ये अतिशय कडक बंदोबस्तात दहावी व बारावी बोर्डाच्या परिक्षा या संपुर्णपणे कॉपीमुक्त वातावरणात संपन्न होत असून सध्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व दोन्ही शिक्षणाधिकारी यांनी राबविलेल्या या विशिष्ट अशा कॉपीमुक्त अभियानामुळे तसेच प्रत्येक परिक्षा दालनातील सीसीटीव्ही कॅमेरा आणि झुम ॲपव्दारे संपूर्ण हॉलचे ऑनलाईन सनियंत्रण होत असल्याने यंदा कॉपी बहाद्दरांना चांगलाच दणका बसला असून कॉपीच्या भरोशावर बसलेले सर्व बहाद्दर धास्तावले आहेत.१९९० मध्ये बीड जिल्ह्यात धिवरे कॉपीमुक्ती पॅटर्न खुप गाजला होता. त्यानंतर यंदा प्रथमच कॉपीमुक्त परिक्षेचा पॅटर्न बीडसह तालुक्यात अतिशय चांगल्या पध्दतीने राबविल्याचे दिसून येत आहे. काही केंद्रावरील गैरप्रकरणामुळे बीड जिल्ह्यासह सर्वच केंद्रांवर त्या कारवाईची मोठी धास्ती घेतल्याचे दिसून येत आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी राबवलेला कॉपीमुक्तीचा पॅटर्न यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे. याचाच प्रत्यय बीड तालुक्यात देखील आला असून बीडचे गटशिक्षणाधिकारी समंदर पठाण यांच्या उत्तम नियोजनाखाली सर्वच परिक्षा केंद्रांवर परिक्षा यशस्वीरित्या पार पडत आहेत. इतिहासात प्रथमच प्रत्येक परिक्षा केंद्रावरील प्रत्येक परिक्षा हॉलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्यात आलेले असून त्याच बरोबर झुम ॲपव्दारे प्रत्येक पेपरला परिक्षा हॉलवरील पर्यवेक्षक यांच्या मोबाईलव्दारे संपूर्ण हॉलचे व त्या वर्गातील सर्व हालचालींचे चित्र व संवाद याचे ऑनलाईनपणे संपूर्ण चित्रीकरण व संनियंत्रण होत आहे. सीसीटीव्ही कॅमेरा व झुम ॲप याच्या संनियंत्रणासाठी मुख्य परिरक्षक तथा गटशिक्षणाधिकारी समंदर पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली वॉर रुम उभारण्यात आलेली असून त्या ठिकाणाहून तालुक्यातील सर्व परिक्षा केंद्रांवरील प्रत्येक हॉल व त्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांवर बारकाईने नजर ठेवली जात आहे. तसेच जिल्हास्तरावरील वॉर रुम याठिकाणी देखील तालुक्यातील सर्व परिक्षा केंद्रांचे सीसीटीव्हीचे संनियंत्रण देण्यात आलेले आहे. या परिक्षा केंद्रांवर केंद्र संचालक सोडता व झुम ॲप हॉलवरील पर्यवेक्षक वगळता इतरांना मोबाईल वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे परिक्षा केंद्रांवर कोणत्याही स्वरुपाचा गैरप्रकार होवू नये यासाठी पोलीस प्रशासनाने देखील कडक बंदोबस्त ठेवलेला आहे. बीड परिरक्षक केंद्रांतर्गत असलेल्या सर्व परिक्षा केंद्रांवर कॉपीचा कोणताही गैरप्रकार आढळून आला तर संबंधित केंद्र संचालक तसेच त्याठिकाणी नियुक्त पथक कर्मचारी व पर्यवेक्षक यांवर तात्काळ कठोर कारवाई करणार असल्याची माहिती परिरक्षक तथा गटशिक्षणाधिकारी समंदर पठाण यांनी दिली आहे.

# आ.सुरेश धस यांचा पंजाब दौरा

## सुवर्ण मंदिरात दर्शन, पंजाब मधील दुग्ध व्यवसायाचा अभ्यास



*''सुवर्ण मंदिरात मिळालेली शांतता आणि सेवा संस्कार प्रेरणादायी आहेत. पंजाबमधील दुग्धव्यवसायात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर दिसून येतो. आपल्या भागातील शेतकऱ्यांनीही आधुनिक पद्धती स्वीकारून उत्पादन वाढवावे, हा या भेटीमागील उद्देश आहे. अभ्यासातून मिळालेली माहिती स्थानिक पातळीवर उपयोगात आणण्यासाठी प्रयत्न करू,''*

*– आ.सुरेश धस*
*विधानसभा सदस्य आष्टी पाटोदा शिरूर*

पाटोदा / महेश बेदरे

शीख धर्माचे प्रमुख श्रद्धास्थान असलेल्या सुवर्ण मंदिर येथे आमदार सुरेश धस यांनी भेट देऊन मनोभावे दर्शन घेतले. मंदिर परिसरातील अमृत सरोवर, सुवर्णमंडित हरमंदिर साहिब आणि सुरू असलेली गुरबाणी यामुळे निर्माण झालेल्या शांत वातावरणात त्यांनी जनतेच्या सुख–समृद्धीसाठी प्रार्थना केली. गुरुद्वारातील लंगर सेवेची व्यवस्थाही त्यांनी पाहिली. दररोज हजारो भाविकांना दिले जाणारे मोफत भोजन, स्वच्छता आणि स्वयंसेवकांची सेवा याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. समानता व बंधुत्वाचा संदेश समाजासाठी मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले. या दौऱ्यादरम्यान आमदार धस यांनी पंजाबमधील प्रगत दुग्धव्यवसायाचा अभ्यास करण्यासाठी वीर डेअरी अँड एग्रीकल्चर फार्म ला भेट दिली. या प्रकल्पातील जनावरांचे वैज्ञानिक संगोपन, संतुलित आहार नियोजन, सायलेज निर्मिती, स्वच्छ गोठे व्यवस्थापन तसेच दुग्धप्रक्रियेतील तांत्रिक बाबींची त्यांनी माहिती घेतली. कमी खर्चात अधिक उत्पादन आणि त्यातून मूल्यवर्धन कसे साध्य करता येते, यावर व्यवस्थापनाशी चर्चा करण्यात आली. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी दुग्धव्यवसाय हा महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो. पंजाबमधील यशस्वी मॉडेलचा अभ्यास करून त्यातील उपयुक्त बाबी महाराष्ट्रात राबविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील, असे धस यांनी स्पष्ट केले.

# समाजाला सन्मार्गाला लावण्याचे कार्य संत भगवानबाबांनी केले

## महंत भगवान महाराज राजपुत यांचे



बीड दि.२ (प्रतिनिधी): संत भगवानबाबांनी सर्व जाती, धर्मातील लोकांना एकत्र करून परमार्थ वाढविला. अध्यात्माबरोबरच सामाजिक सुधारणा करून अनिष्ट रूढी, परंपरा बंद केल्या. समाजाला सन्मार्गाला लावण्याचे कार्य संत भगवानबाबांनी केले, असे प्रतिपादन राजा हरिश्चंद्र संस्थांचे महंत भगवान महाराज राजपुत यांनी केले. बीड येथील श्रीसंत भगवानबाबा सप्ताह समितीच्या वतीने आयोजित सर्वधर्म समभाव अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. भगवान महाराज राजपुत बोलत होते.

या प्रसंगी उपजोनिया पुढती येऊ ।काला खाऊ दहीभात ।। वैकुंठी तो ऐसे नाही । कवळ काही काल्याची ।।एकमेका देऊ मुखी । सुखी घालून उंबरी । तुका म्हणे वाळवंट ।।

बरवे नीट उत्तम संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर त्यांनी भाविकांच्या मनाला भिडणारे आणि तल्लीन करणारे निरुपण केले. काल्याच्या कीर्तनात त्यांनी श्रीकृष्णाच्या विविध लीला, कार्य याविषयी विवेचन केले. अध्यात्माबरोबरच सामाजिक परिस्थितीवर राजपुत महाराज यांनी त्यांनी विविध दृष्टांत देऊन सामाजिक भाष्य केले. श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून ज्ञानदान, अन्नदान आणि सामाजिक कार्य होते. सर्वधर्म समभाव या न्यायाने हे भगवानबाबा प्रतिष्ठान म्हणजे संतश्रेष्ठ भगवानबाबांच्या कार्याप्रमाणे चालणारे संस्थान आहे. बाबांनी त्या काळामध्ये सर्व जाती धर्माचे पंथांचे लोक एकत्र करून परमार्थ वाढवला. काल्याचे महत्त्व सांगत असताना राजपुत महाराज म्हणाले, पहिला काला भगवंताने गोकुळात केला. दुसरा काला ज्ञानेश्वर माऊलींनी वाळवंटात केला. आणि तिसरा काला साधु संतांनी, भगवान बाबा सारखे सर्व संतांनी जो काला केला तो आज पर्यंत वारकरी संप्रदाय करत आहे. ज्यामध्ये ज्ञानदान अन्नदान व साधुसंतांचे विचार, व्यक्ती निर्माण, कुटुंब निर्माण, व समाज निर्माण असे कार्य करत असल्याचे सांगितले.

गायनाचार्य म्हणून अंगद म. सोनवणे, बंडू म. जटाळ, अंगद म. मोरे, शेळके महाराज, मुंडे महाराज, श्रीराम म. सानप आदी सहभागी होते. मृदुंगाचार्य ज्ञानेश्वर माऊली तांदळे, विणेकरी वाल्मीक म. चाटे, रामनाथ म. खेडकर आदींची उपस्थिती होती. यावेळी कीर्तनकार महंत ह.भ.प. भगवान महाराज राजपुत उपस्थित महाराज व पुजारी, सेवेकरी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी खरमाटे महाराज, मुंडे महाराज, स्वामी शिवरुद्रानंद महाराज, बाजीराव खेडकर, प्रा.आर. टी.गर्जे, प्राचार्य दत्तात्रय आघाव, डॉ. अमोल लहाने, नाना सानप, नारायण नागरे, इंजी. पांडुरंग तोंडे, एन.बी. चौरे, सुधाकर सानप, घोळवे सर, चौरे, आदींसह भाविकांची मोठी उपस्थिती होती.

# ऊस जळीत प्रकरणी नुकसान भरपाई देण्याचा न्यायालयाचा आदेश



माजलगाव (प्रतिनिधी) तालुक्यातील मोठेवाडी येथील शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांच्या गट नंबर २५७ मधील ०१हे.४०आर क्षेत्रावरील ऊस व ठिबक सिंचन त्यांचे शेजारी रमेश बाहेती यांच्या गट नंबर २५८ मध्ये असणाऱ्या डी.पी.तील फ्युज तारेच्या स्पार्किंगमुळे लागलेल्या आगीत जळुन खाक झाल्याची घटना एप्रिल २०१५ साली घडली होती, शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांनी तलाठी गंगामसला, तहसीलदार माजलगाव, कार्यकारी अभियंता वि.वि.कं, उपअभियंता वि.वि.कं व मुख्य अभियंता वि.वि.कं, विद्युत निरीक्षक बीड यांना घटनेचे तक्रारी अर्ज दिले होते, त्यानंतर तलाठी पद्माकर मुळाटे यांनी जाय मोक्यावर येऊन पंचनामा केला होता तसेच विद्युत निरीक्षक श्री काळे यांनी घटनेची जायमोक्यावर येऊन पाहणी करून वस्तूनिष्ठ अहवाल दिला होता, त्यामध्ये शेतकरी चंद्रभागाबाई रणखांब यांच्या उस जळीतास विद्युत वितरण कंपनी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्याने नुकसान भरपाई देण्याची सूचनाही त्यांनी केली होती, त्यानंतर शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयाचे अनेकवेळा उंबरठे झिजवुन नुकसान भरपाई ची मागणी केली होती परंतु त्यांना उडवा उडवीची उत्तरे मिळाल्याने त्यांनी भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्यामार्फत रीतसर कायदेशीर नोटीस देऊन नुकसानीच्या रकमेची मागणी केली होती परंतु म.रा.वि.वि.कं.ने नुकसान भरपाई न दिल्यामुळे शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांनी मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर माजलगाव यांचे न्यायालयात नुकसान भरपाईच्या चार लाख रुपयांच्या रकमेसाठी म.रा. वि.वि.कं. विरोधात दावा दाखल केला, त्यानंतर न्यायालयाने म.रा. वि.वि.कंपनीचे मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांना दाव्याचे समन्स काढुन म्हणणे देण्यास सांगितले त्यावर म.रा.वि.वि.कं च्या वतीने म्हणणे देण्यात आले, पुढे प्रकरण पुराव्यासाठी लागले असता शेतकरी चंद्रभागाबाई रणखांब यांच्या वतीने त्यांच्यासह शेजारी संपत सोळंके, तलाठी गंगामसला, विद्युत निरीक्षक व जय महेश कारखान्याचे शेतकी अधिकारी यांना साक्षीदार म्हणून तपासले म.रा.वि.वि.कं च्या वतीनेही पुरावा देण्यात आला त्यानंतर दोन्ही पक्षांच्या वकिलांचा युक्तिवाद करण्यात आला, मा. न्यायालयासमोर आलेला पुराव्यावरून मा. दुसरे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्री चामले साहेब यांनी जळीत ऊस प्रकरणी म.रा.वि.वि.कं ला जबाबदार धरून शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांना चार लाख रुपये नुकसान भरपाई सह सहा टक्के व्याजाने रक्कम देण्याचा आदेश २४फेब्रुवारी रोजी दिला आहे, शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांच्या वतीने भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी काम पाहिले,या निकालामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून म.रा.वि.वि.कंपणीच्या गलथान कारभारास आळा बसण्याची अशा व्यक्त करण्यात येत आहे.

# पिंपळवंडी येथे केंद्रस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न



पिंपळवंडी दि.२ (प्रतिनिधी)– छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पिंपळवंडी केंद्र अंतर्गत दोन दिवसीय केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा केंद्रप्रमुख नरसाळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या दिमाखात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाल्या.

स्पर्धेचा शुभारंभ माजी जि.प.सदस्य अश्विनीताई जरांगे तसेच मान्यवर ग्रामस्थांच्या उपस्थितीत झाला. मागील १० वर्षापासून यानिमित्त क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात येत आहे.या स्पर्धेत केंद्रातील १४ शाळांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन क्रिडांगणात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करून क्रिडा कौशल्य दाखवले. गटशिक्षणाधिकारी गव्हाणे यांनी उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.दि.२६/०२/२०२६ गुरुवार रोजी स्पर्धेतील विजेते विजेत्या संघांना सेवानिवृत्त केंद्रप्रमुख चंद्रकांत उकांडे सर,केंद्रप्रमुख नारायण नरसाळे सर, मुख्याध्यापक शहाजी येवले तसेच शेख मॅडम व केंद्रातील सर्व शिक्षक व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट समालोचन व सूत्रसंचालन एस.आर.पवार सर व समृद्धी पटवा यांनी केले.तर आभार प्रदर्शन केंद्रप्रमुख नरसाळे सर यांनी मानले.

## पवित्र रमजान महिन्यात वीजपुरवठा सुरळीत ठेवा – ॲड.सय्यद आशरफ

पाटोदा : सध्या पवित्र रमजान महिना सुरू असून मुस्लिम बांधव उपवास पाळत आहेत. अशा संवेदनशील काळात पाटोदा शहर व परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. रमजानच्या काळात पहाटे सहरी आणि सायंकाळी इफ्तारच्या वेळेस वीजपुरवठा खंडित झाल्यास उपवासधारकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यासंदर्भात ॲड. आशरफ यांनी महावितरणचे अभियंता शेख यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली व रमजान महिन्यात अखंडित वीजपुरवठा ठेवण्याची विनंती केली. वारंवार होणाऱ्या वीजखंडितीमुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून पवित्र महिन्यात तरी वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.दरम्यान, महावितरणकडून या बाबीची दखल घेण्यात येऊन रमजान काळात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन देण्यात आले आहे.




**आज बीड शहरातील माळीवेस, हनुमान मंदिर येथील मुख्य चौकातील मानाच्या होळीचे पूजन हनुमान मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष श्री. सुनील भाऊ जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी प्रमुख उपस्थिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत नवले यांची होती. यावेळी श्री. विश्वासराव मनसबदार काका, डॉ. लक्ष्मीकांतजी बाहेगव्हाणकर, श्री. शांतीलालजी पटेल, शिवसेना ज्येष्ठ नेते श्री. आनंतजी साखरे, बंडूभाऊ घोलप, श्री. काटकर, श्री. शिवराजजी धांडे, मनोज अग्रवाल, श्री. संजय गायकवाड, ॲड. धांडे, श्री. बाळू धोत्रे, हनुमान मंदिर माळवेस चे पुजारी जगदंबिका प्रसाद, माळीवेस परिसरातील नागरिक भाविक भावसंख्येने उपस्थित होते.**

# संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची जामखेडच्या उपोषणस्थळी भेट



जामखेड (प्रतिनिधी) : जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्गाच्या अनाधिकृत अतिक्रमण व कामातील अनियमितते विरोधात सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांचे गेल्या पाच दिवसांपासून साखळी उपोषण सुरू आहे. सदर उपोषणास आज संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी भेट देऊन पाठिंबा दिला.गेल्या सहा दिवसांपासून जामखेड तहसील कार्यालयासमोर सुरू असलेल्या या साखळी उपोषणामागील भूमिका जाणून घेतल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग असून मराठवाड्याचे प्रवेशद्वार आहे. वाढती अनधिकृत अतिक्रमणे तातडीने हटवली गेली पाहिजेत.''

यावेळी त्यांनी पुढे असेही नमूद केले की, संबंधित अधिकाऱ्यांसोबत नेमकी आजच सभापती प्रा. राम शिंदे यांची जामखेडमध्ये बैठक होणार असल्याची माहिती मिळाली असून, त्या बैठकीतील निर्णयानुसार पुढील भूमिका जाहीर केली जाईल. मुख्यमंत्र्यांशी मी बोलतो.मात्र, शहरातील रस्त्यालगतची अनधिकृत अतिक्रमणे काढलीच पाहिजेत, जामखेडकरांच्या पाठिशी मी ठाम उभा आहे काळजी करू नका असेही ते म्हणाले. या आंदोलनात अत्तापर्यंत सर्वच राजकीय पक्षांबरोबर जामखेड शहर बचाव कृती समिती, मुस्लिम पंच कमिटी,जामखेड तालुका वकील संघ, वंचित बहुजन आघाडी, त्रिदल माजी सैनिक संघटना, डॉक्टर असोशिएशन, संभाजी ब्रिगेड महाराष्ट्र, जिव्हाळा फाउंडेशन, ज्येष्ठ नागरिक संघ या सामाजिक संघटना समवेत नागरिक उत्स्फूर्त सहभागी झाले आहेत.

यावेळी उपोषणस्थळी दै. सुर्योदय चे संपादक गंगाधर काळकुटे, ज्येष्ठ नागरिक प्रा.शहाजी डोके, रंगनाथ राळेभात, प्रा.लक्ष्मण ढेपे, संभाजी मुळे, हनुमंत मोरे, गणेश वारे, सचिन घुमरे, राहुल उगले, विनायक राऊत, अनिल सदाफुले, संभाजी ढोले, संजय डोके उमेश राळेभात, महेश यादव, तात्यासाहेब बांदल आदि मान्यवर तसेच बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# मातंग कुटुंबियांचा बौद्ध पद्धतीने आष्टीत शेकडोच्या उपस्थितीत आदर्श विवाह संपन्न

आष्टी दि २ (प्रतिनिधी) : आष्टी येथे पवार आणि साठे परिवारातील वधू–वरांचा विवाह सोहळा बौद्ध धम्म विधीनुसार अत्यंत मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

बीड जिल्ह्यातील ता.पाटोदा येथील शिवाजी साठे यांच्या कुटुंबातील द्वारिका शुंभागी यांचा विवाह मौजे भाळवणी (ता.आष्टी) येथीलश्रीरंग पवार यांच्या कुटुंबातील द्वारक विशाल या उच्च शिक्षित वधुवरांचा सर्व बहुजन समाजाने आदर्श घ्यावा असा भगवान बुद्ध,शिव, फुले, शाहू, आंबेडकर,अण्णाभाऊ या महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करुन ,सर्वप्रथम उपस्थित सर्व शेकडो बंधु,भगिनी,वंदनीय भन्ते, बौद्धाचार्य यांनी सामूहिक संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करुन,बालकांनी महापुरुषाचीसुंदर वेशभूषा परिधान करत व तसेच ५०० प्रति डॉ.बाबासाहेबांचे जातीव्यवस्थेचे निर्मूलन वे पुस्तक आणि काही संविधानाच्या प्रतीचे आलेल्या पाहुण्यांना वाटप करुन बौद्ध पद्धतीने हा शाही आदर्श मंगल परिणय(विवाह)संपन्न झाला. या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक डी. एस. नरसिंगे, धम्म चळवळीतील कार्यकर्ते प्रबुद्ध साठे, समता सैनिक दलाचे राज्य सचिव अमरसिंह ढाका, लक्ष्मीकांत शिंदे, बीड जिल्हा (प) अध्यक्ष महालिंग निकाळजे, जिल्हा सरचिटणीस सिद्धार्थ जगझाप, जिल्हा बौद्ध पद्धतीने मंगल परिणय संपन्न उपाध्यक्ष (पर्यटन व प्रसार) तसेच ता. आष्टी येथीलभारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी,सदस्य व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी मनोगत केले.


## जाहीरनामा

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशील शोएब नसरुद्दीन सय्यद, रा. गांधनपुरा, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड यांनी विक्रेते १. अमानुल्ला रफतुल्ला सिद्दीकी यांचे मालकी व ताब्यातील नगरपरिषद माजलगाव हद्दीतील सन्मित्र कॉलनी भागातील गट नं. २३० मधील प्लॉट नं.०६, ज्याचा न.प. मालमत्ता क्र. ७–१११ ज्याचे एकूण क्षेत्रफळ ७२ बाय ६० फुट इतके असून त्यापैकी २७ बाय ६० फुट एवढे क्षेत्रफळ ज्याची चतुः सिमा, पुर्वेसः सहन जागा, पश्चिमेस : सरकारी रस्ता, दक्षिणेस लिहून देणार अमानुल्ला सिद्दीकी यांची उर्वरीत जागा, उत्तरेस ॲड. मसलेकर यांचे घर.

येणेप्रमाणे उपरोक्त वर्णनाची व चतुः सिमेच्या आतील मिळकत तदंगभुत वस्तुसह कायम खरेदी करण्याचा ठराव केला असुन सदर मिळकत ही निर्वेध व निर्विवाद तसेच बिनबोजा असल्याचे अश्वासन, विश्वास व खात्री उपरोक्त मालकांनी दिलेली आहे. या मिळकतीमध्ये कोणतेही व्यक्ती, संस्था अथवा बँक इ. चे काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध तसेच इसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, दानपत्र, आमुख्त्यारपत्र इ. स्वरुपाचे हक्क संबंध असतील तर संबधीताने हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ०५ दिवसाच्या आत योग्य त्या पुराव्यासह खालील पत्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आला नाही तर सदर मिळकतीचे कायम खरेदीखत आमचे अशील करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही व कसलाही आक्षेप चालणार नाही याची नोंद घ्यावी. सबब हे जाहिर प्रगटन.

दिनांक : ०२/०३/२०२६

मार्फत :
**ॲड. दिपक एल. देशमुख,**
ऑफीस : ऑफीस नं. २२,
लोढा टॉवर, माजलगाव,
ता. माजलगाव जि.बीड ४३१ १३१
मो.नं. ९८५००६१७७७

जाहिर प्रगटन देणार
**शोएब नसरुद्दीन सय्यद**
रा.गांधनपुरा, माजलगाव ता. माजलगाव
जि.बीड मो. नं. ८३७८८८८४४४

## जाहीर प्रगटन

**मा.सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दि.अर्ज ७०/२०२६ बायनाबाई व ईतर विरुध्द निरंक मार्फत : श्री.एस.बी.थोरवे

ज्यापेक्षा **अमृता उर्फ अमृतराव पि. छनाजी बांगर**, हे दिनांक १९/०९/२०२५ रोजी मयत झाले असुन खालील अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

१.बायनाबाई भ्र. अमृतराव बांगर, वय ८२ वर्षे, बंदा घरकाम, २.अजयकुमार पि. अमृतराव बांगर, वय ४२ वर्षे, धंदा नोकरी, ३.विजयकुमार पि. अमृतराव बांगर, वय ४२ वर्षे, धंदा नोकरी, ४.मंगल भ्र. प्रभाकर गोपाळघरे, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम, ५.सुभद्राबाई भ्र. भुजंगराव सानप, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम ६.सिलावती भ्र. वसंत पाखरे, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, ७.संगिता भ्र. महादेव गिते, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, ८.बायसाबाई भ्र. शामराव गोपाळघरे,वय ४७ वर्षे, धंदा घरकाम. ९.प्रतिभा भ्र. अवधुत ठोंबरे, वय ३७ वर्षे, धंदा नोकरी

अर्जदार क्र.१ ते ३ व ६ यांचा पत्ता : रा.भाथाळा, ता. पाटोदा जि. बीड. अर्जदार क्र ४ यांचा पत्ता : रा. घुलेवाडी, ता. भूम जि. धाराशिव. अर्जदार क्र ५ यांचा पत्ता : रा.पौडुळ, ता. शिरुर का. जि. बीड. अर्जदार क्र ७ यांचा पत्ता : रा. पांढरेवाडी, ता. जामखेड जि. अ.नगर. अर्जदार क्र ८ यांचा पत्ता : रा. भक्ती कन्स्ट्रक्शनजवळ, भाग्योदय कॉलनी, बीड, ता.जि. बीड. अर्जदार क्र ९ यांचा पत्ता : रा. दहिफळ वडमाउली, ता. केज जि. बीड.

ज्याअर्थी, अर्जदार क्र १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क्र ४ ते ९ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते भयताचे वारस असल्याबाबतचे प्रभाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत **अमृता उर्फ अमृतराव पि. छनाजी बांगर**, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी,

आज **दिनांक १२/०२/२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
**पु.ता.०७/०४/२०२६**

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
क.स्तर, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड.

क.लिपीक


# भारतीय लॅक्रोस संघाचा ऐतिहासिक सुवर्ण विजयात पाडळीचे सुपुत्र अनिस शेख यांची महत्त्वपूर्ण कामगिरी



खालापुरी (प्रतिनिधी) :सौदी अरेबियातील रियाध येथे पार पडलेल्या आशियाई लॅक्रोस स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय लॅक्रॉस संघाने प्रतिस्पर्धी संघावर दणदणीत विजय मिळवून भारतीय संघाला सुवर्णपदक मिळवून दिले व भारताचे नाव संपूर्ण जगात चमकवले. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे भारताच्या क्रीडा इतिहासात प्रथमच पुरुष व महिला दोन्ही लॅक्रॉस संघाने सुवर्णपदक पटकावले आहे हा विजय भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी मोलाचा मानला जात आहे.भारतीय संघाच्या या यशामागे खेळाडूची कठोर मेहनत, प्रशिक्षकाचे मार्गदर्शन, तसेच संघ व्यवस्थापनाचे मोलाचे योगदान लाभले आहे. भारतीय संघामध्ये शिरूर कासार तालुक्यातील पाडळी येथील सुपुत्र आणि श्री अनिस लतीफ शेख हे होते.भारतीय संघाला सुवर्णपदक मिळाल्यामुळे संघातील पाडळी गावाचे नाव या खेळाडूंनी रोशन केले आहे अशा या खेळाडूचा पाडळी परिसरातील व शिरूर तालुक्याला सार्थ अभिमान असुन अनिस लतीफ शेख यांचा पाडळी मध्ये जाऊन राज्याचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता डी. जी .मळेकर यांनी सत्कार केला.व त्याचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी शिवसेनेचे तालुकाप्रमुख किरण चव्हाण, माजी सदस्य भगवानज पाखरे, , दिलीप कंठाळे, सुभाष कंठाळे, मधुकर घोडके, ऋषी राऊत, फिरोज शेख अक्षय इंगळे, बालाजी इंगळे, युवराज जाधव,, भारत घरगीने , सचिन घरगिने व इतर मंडळी उपस्थित होते



न.प.निवडणुकीत
एकही देव नाही सोडला
केलेल्या नवसाने
विरोधक पडला
-अमरनाना नाईकवाडे
जिल्ह्याच्या विकासाचं
मला काय पडलयं ?
मी काम करते जिथं
राहुल गांधीचं नडलं
-खा.रजनीताई पाटील
बीडकरांनी दिला मला
नगराध्यक्ष पदाचा मान
पण जिथं तिथं होतोय
जावयाचाच सन्मान
-नगराध्यक्षा प्रेमलता पारवे
पवनचक्की कंपनीला
माझा सतत आधार
त्यांची काम अडवायची
कोणाची आहे मदार
-एस.पी.कॉवत
पुर्वी माझ्या वजनावरच
'शुभम' नगर पालिकेत गेला
पण आता जनतेनेच
त्याला नगर सेवक केला
-दिलीप धुत
नाही मिरविला तोरा कधी
नाही दाखविली शान
म्हणून मिळाला मला
नगर सेवकाचा मान
-शुभम धुत
घराचे वासे फिरतात
तसंच झालयं माझं
सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानं
आयुष्य वाटतयं खुजं
-वाल्मीक कराड
शिक्षणाच्या प्रश्नावर
सतत घालतोय पिंगा
नाही ऐकलं तर
दाखवितोय इंगा
-मनोज जाधव
या जिल्ह्यामध्ये
ऐकावं तरी कोणाचे
तक्रारी सांगणारे तरी
किती आहेत गुणाचे
-जिल्हाधिकारी
सावरकरांच्या विचारांचा
मला आहे लळा
जिथे जातो, तिथं
फुलवित असतो
देशभक्तीचा मळा
-डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर
कार्यक्रमासाठी जास्त
पण कर्तव्यासाठी थोडं
प्रसिद्धीसाठी डॉ.तांदळेला
फिरवतोय मागं पुढं
-फौजदार विजय जाधवर
मोजकेच कार्यकर्ते
पण करतोय गाजावाजा
मी प्रगती केली ते
माझा बंगला येऊन बघा
-सुभाष राऊत
दारु परवान्याला सतत
करीत असतो विरोध
पण लोक म्हणतात कसे
हातभट्टी बाबत का गारद ?
-ॲड.अजित देशमुख
डॉ.ढवळेंच्या सुचनांची
करावी लागतेय कदर
म्हणूनच होत नाही
माझ्या नावाचा गदर
-तहसिलदार शेळके
केजच्या जनतेशी मी
करीत नाही गद्दारी
जाहिराती देतो पण
देत नाही उधारी
-हारुण इनामदार
आमदार झाल्यामुळे
ठेवतोय विकासाचं भान
पण भैय्याशिवाय माझं
हालत नाही पान
आ.विजयसिंह पंडित
निवडणुकातील आपटीनं
करु म्हणतोय सुधार
बाळाराजेंच्या कर्तुत्वावर
माझ्या भविष्याची मदार
-माजी आ.लक्ष्मण पवार
चुकला की टिपला
ही माझी नीती
म्हणून अधिकारी घेतात
माझ्या आंदोलनाची भीती
-डॉ.गणेश ढवळे
बीडच्या ट्रॅफीकवर
सतत विचार करतोय
कधी तरी हा हू करुन
गचगार बसतोय
-स.पो.नि.सुभाष सानप
आमदार जे झाले त्यांनी
केली नाही माझी कदर
म्हणूनच सावंत साहेबांना
मानतोय मी गॉडफादर
-अशोक रोमन
आठवले साहेबांचा
मी एकटाच 'चेला'
फक्त गायरान प्रश्नी
मी खेळतोय 'धुल्ला'
-पप्पु कागदे
राजकारणात उगवतात
इथून तिथून कारली
बीडला कोणी विचारेना
म्हणून गेवराई धरली
-चंद्रकांत नवले
अनेकांनी दिला होता
न.प.लढविण्याचा सल्ला
पण आमदारानचं गेम करुन
कचऱ्यात फेकलयं हो मला
-विजय लव्हाळे
माझ्या सावत्रा परिषदेचा
सतत करारी बाणा
पक्षवाल्यांनो आता तरी
मला पैलवान म्हणा
-कल्याण आखाडे
मतदार संघाच्या विकासात
माझा मोठा हात
पण लोक म्हणू लागलेत
करतेय आकड्याची बात
-आ.नमिता मुंदडा
कितीही सांभाळले तरी
व्हायचं तेच झालं
आता कशातून करु मी
ज्याचं त्याचं भलं
-डॉ.योगेश क्षीरसागर
माझा दरारा तरी
हे काय दिवस आले
फेसबूकवरुन मला
धमक्या देऊ लागले
-आ.सुरेश धस
कसं थांबवू जि.प.मधील
सततच्या गोंधळास
एकदाच घडा दाखविते
मी थोडाच आहे आंधळा
-सीईओ रहेमान
इकडचं अन् तिकडचं
बंद दिसतयं 'गेट'
आशा सर्व मावळल्या
घेतोय सांत्वनपर 'भेट'
-नितीन नाईकनवरे
हातात तुतारी घेऊनही
मला वाजविता येईना
प्रयत्न सोडून दिले
पुढं काही का होईना
-मोहन जगताप
बँक प्रकरणी केलं
मला नीरव मोदी
म्हणूनच गेली माझी
नगराध्यक्ष पदाची गादी
-राजकिशोर मोदी
अहो,बाबुराव म्हणू नका
जरा मला वेगळं पहा
न.प.मध्ये माझे चार सदस्य
तसा मी आहे बादशाह
-बाबुराव पोटभरे
पत्रकारितेसाठी
दिवसरात्रं मरतोय
पोहायला जाताना थोडी
रनिंग देखील करतोय
-तुकाराम येवले
सून झाली नगराध्यक्ष
तसा मी ही उपनगराध्यक्ष
न.प.माझ्या घरात
सुरक्षेला पवारांचा पक्ष
-सहाल चाऊस
आंदोलनासाठी माझी
सतत असते 'घाई'
पण काय करु आता
मागं कोणीच येत नाही
-भाई गंगाभिषण थावरे
होली है
भाई होली है
बुरा ना मानो
होली है
तावरेच्या हाती
मनसेचा किल्ला
माझ्या गळ्यात मात्र
नुसता पदाचा बिल्ला
-सदाशिव बिडवे
कोणीही कुठंही
खायना का मेवा
पण माझी असते
फक्त भाजपचीच सेवा
-जगदीश गुरखुदे
नगराध्यक्ष मॅडम भोवती
साहेबाचीच असते टोळी
स्वत:च्या भल्यासाठी
भाजतात स्वत:चीच पोळी
-राजू जाधव
दारु झाली सरकारी
यंत्रणेचाच आधार
तसं बार सोडून मी
बसलो आहे गचगार
-गोविंद वनवे
न.प.निवडणुकीत केली
ज्याची त्याची हांजी हांजी
मॅडम झाल्या नगर सेवक
अन् मी त्यांचा दिवाणजी
-जकी सौदागर
उपनगराध्यक्ष पदावर
होता माझा डोळा
पण ऐनवेळी कसा
झाला हो माझा खुळखुळा
-फारुक पटेल
या खुर्चीवर मी
कधीतरीच बसतो
फायलींचे ढिगारे झाले तरी
कधीच कार्यालयात नसतो
-मुख्याधिकारी अभय जोशी (पाटोदा)
जेलमध्ये सडलो
म्हणून काय झालं
गुन्हे दाखल करुन
कोणाचं झालयं भलं
-सुरेश कुटे
गाडगेबाबांच्या जयंतीला
मी समाजातच असतो
इतर वेळी मात्र
मी न्यायालयातच दिसतो
-ॲड.सुधीर जाधव
निवडणुका जिंकणं
सोपी नाही बाब
आमदारकी मॅडमची
पण माझाच असतो रुबाब
-अक्षय मुंदडा
निवडणुकीवेळी
म्हणतात मतदान देतो
पण ऐनवेळी मात्र
लोचाच होतो
-प्रकाश कानगावकर
कोलांट्या उड्या मारल्या
कुठंच लागेना मेळ
कार्यकर्तेसांभाळतांना
होऊ लागली घालमेल
-राजेंद्र मस्के
शिवसंग्रामसाठी आली
माझ्या एकट्यावर वेळ
कार्यक्रमावर खर्च करुन
घालते कार्यकर्त्यांचा मेळ
-ज्योतीताई मेटे
जिल्हा प्रमुख म्हणून माझे
सतत केज तालुक्यावर लक्ष
पण कार्यकर्त्यांच्या भल्यासाठी
काहीच देईना हो पक्ष
-सचिन मुळूक
राजकारण करायला
कशा घालू पायघड्या
मामाच्याच जीवावर
माराव्या लागतात उड्या
-कपिल सोनवणे
रेल्वे येण्यासाठी
सर्वच करीत होते घाई
पण प्रश्न तडीस
लावण्यासाठी
ते पूर्ण केले मी
सर्वकाही
-खा.बजरंग सोनवणे
ठाकरेंचा सैनिक म्हणून
घेतला शिवसेनेचा वसा
डरकाळी फोडू वाटतेय पण
बसलाय हो माझा घसा
-गणेश वरेकर
माझ्या कचाट्यात आला
त्याला नाही सोडत
पण लोकांच्या जवळकीनं
असे आता नाही घडत
-शीतलकुमार बल्लाळ
नवीन खाते मिळाल्याने
ताणही आहे तसा कमी
विकासाच्या नवीन
योजना असतात मनात
पण निसर्गाची देता येत नाही हमी
-पंकजाताई
दोन शिवसेना झाल्याने
माझे झाले खच्चीकरण
आहे ती शिवसेनाच चांगली
हेच समजतो शुद्धीकरण
-गणेश राऊत
परमार्थाचा मार्ग धरण्या
नाही लागत कसलच धन
संताच्या सहवासात
माझं भरुन येतं मन -नवनाथ शिराळे
शब्दरंग
धुलीवंदनाच्या
निमित्ताने
उधळीला हो शब्द 'रंग'
प्रेमाचे आपले नाते
नका होऊ देऊ हो भंग
-गोरख चिंचोलीकर
Mob.9420024333